14 वर्ष वर्धापन दिन
पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक
# सिटी न्यूज सुपरफास्ट
अकोला ■ वर्ष १५ ■ अंक ३३१ ■ बुधवार, दि. १० जून २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८
RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# अखेर दोघांना पाठविले सक्तीच्या रजेवर

## ◆ आमदार साजिद खान यांची आक्रमक भूमिका ◆ महिलेच्या पाठीवर रुग्ण पतीचे प्रकरण



प्रतिनिधी १० जून

**अकोला :** अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात प्रशासकीय अनागोंदी आणि गैरप्रकारांच्या तक्रारींनंतर रुग्णालय प्रशासनाने मोठी कारवाई केली आहे. अंतर्गत चौकशीत दोषी आढळलेल्या कर्मचाऱ्यांवर तात्काळ पावले उचलण्यात आली आहेत. प्राथमिक चौकशीत दोषी आढळलेला मुख्य कर्मचारी कृष्णा गजबे याला प्रशासनाने दोन महिन्यांच्या सक्तीच्या रजेवर पाठवले आहे. या प्रकरणातील इतर संशयित कर्मचाऱ्यांच्या बदल्यांसाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवला जाणार आहे. असे अधिष्ठाता डॉ. सोनुने यांनी स्पष्ट केले.आज आमदार साजीद खान पठाण यांच्या भेटीनंतर हा निर्णय घेण्यात आला.

भविष्यात असे प्रकार टाळण्यासाठी रुग्णालयातील प्रशासकीय पकड मजबूत केली जात आहे. तसेच वैद्यकीय सामाजिक कार्यकर्त्यांची संख्या आणि स्ट्रेचरची संख्या देखील वाढवण्यात येत आहे. रुग्णालयाच्या आवारात येऊन वारंवार फोटो काढणे, कर्मचाऱ्यांना त्रास देणे आणि संस्थेची नाहक बदनामी करणाऱ्या १३ ते १४ जणांच्या टोळीविरुद्ध वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या परवानगीने पोलीस चौकशी सुरू करण्यात येत आहे. रुग्णांसाठी अत्यंत महत्त्वाची असलेली एमआरआय मशीन आगामी १५ ऑगस्टपर्यंत पूर्णपणे कार्यान्वित होईल, अशी माहिती अधिष्ठाता यांनी दिली.रुग्णालयात येणारा प्रत्येक रुग्ण हाच प्रशासनाचा मुख्य केंद्रबिंदू असून, रुग्णांची गैरसोय खपवून घेतली जाणार नाही आणि पारदर्शकता आणण्यासाठी आवश्यक ते सर्व बदल केले जात असल्याचे प्रशासकीय अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

### आमदार साजिद खान पठाण यांचा पाठपुरावा

अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात (उश्ण्) काही दिवसांपूर्वी एका हताश महिलेला स्ट्रेचर किंवा वॉर्ड बॉयची मदत न मिळाल्याने, तिने आपल्या आजारी पतीला खांद्यावर वाहून नेल्याचा एक धक्कादायक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. या संवेदनशील प्रकरणाची दखल घेत अखेर प्रशासनाने मोठी कारवाई केली आहे. या विषयावर आ. साजीद खान पठाण यांनी पाठपुरावा केला होता. या गंभीर निष्काळजीपणाबाबत वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्याकडे रीतसर तक्रार दाखल करण्यात आली होती. त्यानंतर या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी एक समिती नियुक्त करण्यात आली. केवळ वार्ड बॉयच नव्हे, तर रुग्णालयात तैनात असलेल्या सुरक्षा रक्षकांच्या निष्काळजीपणाचीही एक यादी तयार करण्यात आली आहे. विभागीय चौकशीनंतर त्यांच्यावरही कडक निलंबनाची किंवा दंडात्मक कारवाई होण्याची दाट शक्यता आहे.

# मुंबईसह पुण्याच्या महापौरांना धमकीचे ई-मेल!

प्रतिनिधी १० जून

**मुंबई :** पुणे महापौर कार्यालयापाठोपाठ मुंबई महानगरपालिकेच्या महापौरांनाही धमकीचा ई-मेल आला आहे. या ई-मेलमध्ये महापौरांची गाडी आणि महापौरांचे दालन बॉम्बने उडवून देण्याची धमकी देण्यात आली आहे. धमकीचा ई-मेल मिळाल्यानंतर महापालिका प्रशासन आणि सुरक्षा यंत्रणा सावध झाली असून महापालिका मुख्यालयात सुरक्षा व्यवस्था सतर्क करण्यात आली आहे. दरम्यान, धमकीच्या मेल मध्ये महापौर कार्यालय, मुख्यमंत्री कार्यालय बॉम्बने उडवण्याबाबत उल्लेख आहे. १ वाजून ११ मिनिटांनी महापौर कार्यालय आणि ३ वाजून ११ मिनिटांनी पालिकेची कार्यालये उडवण्याबाबतचा उल्लेख आहे. तसेच पुणे महापालिकेच्या महापौर मंजुषा नागपुरे यांच्या कार्यालयाला बॉम्बने उडवून देण्याची धमकी मिळाली आहे. सुरक्षेसाठी पालिका इमारत रिकामी करण्यात आली असून पोलीस आणि बॉम्ब स्कॉड तपास करत आहेत.

# मनपाचा 'रामभरोसे' कारभार ! सत्तापक्षाचा नाही वचक

## सकाळी १० वाजता प्रमुख विभाग 'लॉक'

प्रतिनिधी १० जून

**अकोला :** अकोला महानगरपालिकेत सत्ताधारी भारतीय जनता पक्षाचा प्रशासनावरील वचक पूर्णपणे संपुष्टात आल्याचे धक्कादायक चित्र आज सकाळी एका ग्राउंड रिपोर्टमधून समोर आले आहे. सकाळी ठीक ९.४५ वाजले तरी महापालिकेचे मुख्य प्रवेशद्वार आणि अंतर्गत अनेक महत्त्वाचे विभाग चक्क कुलूपबंद (लॉक) होते. जनतेच्या करातून लाखो रुपयांचे वेतन घेणारे कर्मचारीच काय, तर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या खुर्च्याही रिकाम्या होत्या. धक्कादायक बाब म्हणजे, ज्यांच्यावर मनपाचा गाडा हाकण्याची जबाबदारी आहे, ते महापौर, उपमहापौर आणि सभापती देखील १० वाजेपर्यंत फिरकले नव्हते. महानगरपालिकेत दररोज शेकडो नागरिक आपल्या विविध कामांसाठी लांबून येत असतात. मात्र, लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांच्या या 'लेट-लतिफ' आणि मनमानी कारभारामुळे अकोलेकरांना तासनतास ताटकळत उभे राहावे लागत आहे. सत्ताधारी पक्षाचे नियंत्रण नसल्यामुळेच अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे फावले असून, 'कोणीही यावे आणि कधीही जावे' अशी स्थिती निर्माण झाली आहे. भाजपच्या या ढिसाळ कारभारामुळे अकोल्याचा विकास होणार कसा, असा संतप्त सवाल आता नागरिक विचारत आहेत.महापालिकेच्या अनेक विभागांना सकाळी १० वाजता कुलूप असणे हे बायोमेट्रिक हजेरी प्रणालीच्या अपयशाचे जळजळीत उदाहरण आहे.

(सविस्तर वृत्त शेवटच्या पानावर)



### दाखले रखडले, परवानग्या लटकल्या

'सरकारचे नियम फक्त कागदावरच, प्रत्यक्षात मात्र सेवा हमी कायद्याची महापालिकेतच ऐशीतैशी केली जात आहे,' अशी संतप्त प्रतिक्रिया एका त्रस्त नागरिकाने दिली. अकोला महापालिकेच्या बेजबाबदारपणामुळे आज सर्वसामान्य जनतेला जन्म-मृत्यूच्या दाखल्यांपासून ते घर बांधकामाच्या परवानग्यांसाठी मनपाचे उंबरठे झिजवावे लागत आहेत. सध्या मनपामध्ये हजारो जन्म-मृत्यूचे दाखले प्रलंबित असून, वेळेत कागदपत्रे मिळत नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्रवेश आणि नागरिकांची इतर महत्त्वाची कामे खोळंबली आहेत.

### मनपातील 'महा-गैरहजेरी'वर विरोधक गप्प का

महापालिकेत अधिकारी, कर्मचारी आणि सत्ताधारी पदाधिकाऱ्यांची सुरू असलेली सामूहिक दांडी आणि दप्तरदिरंगाई आता चव्हाट्यावर आली आहे. मात्र, या गंभीर परिस्थितीवर शहरातील विरोधी पक्ष अजूनही झोपेतच असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. 'सत्ताधाऱ्यांचा वचक संपला हे उघड आहे, पण जनतेच्या हक्कांसाठी विरोधक कधी जागे होणार ?' असा रोखठोक सवाल आता अकोल्यातील सजग नागरिक उपस्थित करत आहेत.

# भाविकांची बोट गोदावरीत उलटली !

## ◆ लोणारच्या महिलेचा मृत्यू; वाशिमच्या आजीबाई गंभीर

प्रतिनिधी १० जून

**माजलगाव (बीड) :** अधिक मासानिमित्त बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यातील भगवान पुरुषोत्तमपुरी या पवित्र तीर्थक्षेत्री भाविकांची मोठी गर्दी आहे. प्रशासनाच्या अक्षम्य हलगर्जीपणामुळे एक अत्यंत भीषण आणि धक्कादायक दुर्घटना समोर आली आहे. पुरुषोत्तम देवाच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांना गोदावरी नदीच्या एका तीरावरून दुसऱ्या तीरावर घेऊन जात असताना, प्रवाशांनी खच्चून भरलेली बोट १० जून रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास अचानक नदीपात्रात उलटली. या भीषण अपघातात लोणारच्या एका ५५ वर्षीय महिला भाविकाचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला आहे, तर वाशिम येथील एक ७५ वर्षांची वृद्ध महिला गंभीर जखमी झाली आहे. नदीपात्रात बोट उलटताच संपूर्ण परिसरात एकच मोठा आक्रोश आणि खळबळ उडाली.



पवित्र अधिक मास सुरू झाल्यामुळे पुरुषोत्तमपुरी येथे देशभरातून आणि संपूर्ण महाराष्ट्रातून लाखो भाविक दर्शनासाठी आणि गोदावरी नदीत स्नानासाठी येत आहेत. याचाच फायदा घेऊन बोट चालकाने बोटीच्या प्रत्यक्ष क्षमतेपेक्षा कित्येक पटीने जास्त भाविकांना बोटेमध्ये कोंबले. बोट नदीच्या मध्यभागात पोहोचली असता, वजनाचा तोल बिघडल्याने ती अचानक गोदावरीच्या खोल पात्रात उलटली. बोट उलटताच बोटीतील महिला, पुरुष आणि लहान मुले पाण्यात बुडू लागले. बोट उलटल्याचे पाहताच किनाऱ्यावर उपस्थित असलेल्या स्थानिक मच्छीमार आणि पोहणाऱ्या तरुणांनी तात्काळ नदीपात्रात उड्या घेतल्या. त्यांनी पाण्यात बुडत असलेल्या अनेक भाविकांना शिताफीने सुखरूप बाहेर काढले.

मात्र, दुर्दैवाने प्रनिला शेषराव राठोड (५५) रा. लोणार, जि. बुलढाणा) यांचा मृत्यू झाला. तर दुसरी महिला सिंधुबाई अर्जुन मावळे (७५) रा. महागाव, जि. वाशिम या पाण्यात बुडाल्याने अत्यंत गंभीर जखमी झाल्या आहेत. त्यांना तातडीने नदीबाहेर काढून माजलगाव येथील एका खाजगी रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून, त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे वैद्यकीय सूत्रांनी सांगितले.

# आज अजितदादा आपल्यात नाहीत

## सुनेत्रा पवार यांचे कार्यकर्त्यांना भावनिक आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचा वर्धापन दिन साजरा

प्रतिनिधी १० जून

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वर्धापन दिनानिमित्त नवी दिल्लीतील पक्षाच्या राष्ट्रीय कार्यालयात नवनियुक्त राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. पक्षाची सूत्रे हाती घेतल्यानंतर त्यांच्या नेतृत्वाखाली साजरा होणारा हा पहिलाच वर्धापन दिन असून, खासदार पार्थ पवार, युवक प्रदेशाध्यक्ष धीरज शर्मा यांच्यासह अनेक पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. दिल्लीतील कार्यक्रमानंतर मुंबईतील षण्मुखानंद सभागृहात मुख्य वर्धापन दिन सोहळा पार पडणार आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या स्थापनेला २७ वर्षे पूर्ण होत असताना यंदाचा वर्धापन दिन मात्र वेगळ्याच भावनांनी भारलेला आहे. जानेवारी महिन्यात बारामतीजवळ झालेल्या विमान अपघातात उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे अकस्मात निधन झाल्यानंतर पक्षाचा हा पहिलाच वर्धापन दिन आहे. त्यांच्या जाण्याने केवळ पक्षालाच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राला मोठा धक्का बसला होता. कार्यकर्त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणारे, प्रत्येकाला आधार देणारे नेतृत्व हरपल्याची भावना आजही राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांमध्ये कायम आहे.

याच पार्श्वभूमीवर सुनेत्रा पवार यांनी सोशल मीडियावर भावनिक पोस्ट करत दादांच्या स्मृतींना अभिवादन केले. 'आज अजितदादा आपल्यात नाहीत, ही पोकळी प्रत्येक क्षणी जाणवते. मात्र त्यांनी जपलेला माणुसकीचा वारसा, विकासाचे राजकारण आणि कार्यकर्त्यांप्रती असलेली बांधिलकी पुढे नेण्याचा निर्धार करूया,' असे आवाहन त्यांनी केले. तसेच शिव-शाहू-फुले-आंबेडकर यांच्या विचारांवर चालत अधिक सक्षम आणि प्रगत महाराष्ट्र घडवण्यासाठी नव्या जोमाने काम करण्याचे आवाहनही त्यांनी पक्ष कार्यकर्त्यांना केले.




# आता अकोटात कमांडोच्या सुरक्षेत युरियाचे वाटप !

## ◆ शेतकरी रात्रभर कृषी केंद्राबाहेर झोपले, कृषी केंद्राबाहेर पोलीस कमांडो तैनात

प्रतिनिधी १० जून

**अकोट :** जिल्ह्यातील अकोटमध्ये युरियासाठी अक्षरशः हाहाकार उडालाय. १० जून रोजी सकाळी ९ वाजेनंतर अकोटमधील कृषी बाजारपेठ उघडली. या ठिकाणी लागलेल्या शेतकऱ्यांच्या रांगांना नियंत्रण करण्यासाठी थेट पोलीस बंदोबस्त मागवण्यात आला.

खरिपाच्या पेरणीसाठी युरिया मिळावा, यासाठी शेतकऱ्यांनी रात्रीपासूनच कृषी केंद्रांबाहेर मुक्काम ठोकला आहे. शेतकऱ्यांनी अख्खी रात्र जागून काढून पहाटेपासूनच कृषी केंद्रांबाहेर रांगा लावण्यास सुरूवात केली होती. दुकान उघडल्यानंतर शेतकऱ्यांची एकच झुंबड कृषी केंद्र बाहेर पाहायला मिळाली. काही ठिकाणी शेतकऱ्यांमध्ये वादही होताना दिसत होते. त्यामुळेच प्रशासनाने आता अकोटमधील कृषी केंद्रात बाहेर थेट पोलीस कमांडोंचा बंदोबस्त लावला. राज्यातील शेतकऱ्यांच्या नशिबी कायमच रांगा आहेत का? कधी स्वतःला 'बळीराजा' म्हणवणारा शेतकरी कर्जमाफीसाठी थंब देण्यासाठी रांगेत असतोय, तर कधी त्याला बियाणं घेण्यासाठी आणि खत घेण्यासाठी रांगेत उभं रहावं लागत आहे.

दरम्यान, रात्री तीनच्या अंधारात सुरू झालेला खत मिळवण्यासाठीचा संघर्ष सकाळी झुंजूमुंजू झालं तरी सुरूच होता. जिल्ह्यात दोन दिवसांपूर्वीच अकोटमध्ये युरिया खरेदीसाठी शेतकऱ्यांच्या मोठमोठ्या रांगा लागल्या होत्या. त्यामध्ये कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊन पोलिसांनाही पाचारण करावं लागलं होतं. मात्र जिल्हा प्रशासनाने यानंतरही कोणतीच खबरदारी न घेतल्याने आजही तीच परिस्थिती अकोटमध्ये दिसत आहे. या रांगेत ७५ वर्षाच्या वृद्ध शेतकऱ्यांपासून तर १२ वर्षाच्या शेतकऱ्यांच्या मुलांचाही समावेश होता. रांगेत नंबर लावण्यावरून शेतकऱ्यांमध्ये वाद होतानाही दिसत आहेत.



### व्यावसायिकांची माणुसकी आली शेतकऱ्यांच्या मदतीला!

शहरात युरियासाठी मोठा गोंधळ उडाला असून, शेतकऱ्यांनी अख्खी रात्र कृषी केंद्राबाहेर जागून काढलीय. या संपूर्ण परिस्थितीमुळे शेतकरी सैरभैर आणि संतप्त झाले. या परिस्थितीतही एक माणुसकीचे दर्शन घडविणारा प्रसंग अनुभवास आला. रांगेतील शेतकऱ्यांसाठी कृषी केंद्रांच्या मालकांकडून नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली आहे. शेवटी व्यावसायिकांची माणुसकीच शेतकऱ्यांच्या मदतीला धावून आल्याची चर्चा घटनास्थळी होत होती.

### अखेर प्रशासन झाले जागे!

◆ शेतकऱ्यांच्या रांगांची माहिती होताच प्रशासन जागे झाले असून, कृषी केंद्रावर स्कृषी अधिकाऱ्यांना पाठविले आहे. कृषी अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत शेतकऱ्यांना कुपन वाटप करण्यात आले. तसेच पोलिस कमांडोही तैनात करण्यात आले आहेत. त्यामुळे आता किती शेतकऱ्यांना किती युरिया मिळतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा
बुधवार दि. १० जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

महाराष्ट्रात दरवर्षी १० जून हा दिवस 'दृष्टीदान दिन' म्हणून पाळला जातो. सुप्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ डॉ. रामचंद्र आत्माराम भालचंद्र यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस साजरा केला जातो. या दिवशी राज्यात नेत्रदानाबद्दल व्यापक जनजागृती केली जाते. अनेक व्यक्ती कॉर्नियाच्या (बुबुळाच्या) अंधत्वामुळे दृष्टीपासून वंचित असतात. मृत्यूनंतर नेत्रदान केल्यास अशा व्यक्तींना पुन्हा जग पाहण्याची संधी मिळते. कोणत्याही वयोगटातील व्यक्ती नेत्रदान करू शकते. चष्मा घालणारे, मधुमेह किंवा रक्तदाब असलेले लोकही मृत्यूनंतर नेत्रदान करू शकतात. मृत्यूनंतर अवघ्या ४ ते ६ तासांत डोळे दान करणे आवश्यक असते. नेत्रदानाचे महत्त्व वाढवण्यासाठी राज्यभरात विशेष शिबिरे आयोजित केली जातात. अकोला किंवा तुमच्या जवळच्या परिसरातील शासकीय रुग्णालयांमध्ये किंवा नेत्रपेढ्यांमध्ये यासाठी समुपदेशक असतात.नेत्रदानाची प्रतिज्ञा करण्यासाठी किंवा याबाबत अधिक माहिती मिळवण्यासाठी तुम्ही जवळच्या नेत्रपेढीशी संपर्क साधू शकता.

# मृत्यूनंतरही जग पाहण्यासाठी करा नेत्रदान !



जन्म-पुनर्जन्म, मोक्ष असा अंधश्रद्धेचा जबरदस्त पडगा, अज्ञान, आळस आणि सेवाभावी वृत्तीचा अभाव अशा कारणांमुळे महाराष्ट्रासह देशातील दृष्टिदान चळवळीत मोठे अडथळे निर्माण होत आहेत. श्रीलंकेसारखे छोटेसे राष्ट्र जगात नेत्रदानात आघाडीवर आहे. परिणामी भारतासह जगातील किमान २५ देशांना श्रीलंकेतील आयबँकेतून नेत्र पुरवले जात आहेत. दरवर्षी १० जून रोजी राज्यात दृष्टिदान दिन पाळला जातो. त्यानिमित्त ठिकठिकाणी जनजागृती कार्यक्रम होतात. पण अजूनही नेत्रदानाबाबत समाजात प्रचंड अंधश्रद्धा आहेत. रक्तदानाबाबत राज्यात जनजागृती होत आहे, पण नेत्रदानाबाबत उदासीनता असल्याचे या क्षेत्रातील तज्ज्ञ डॉक्टर व नेत्रदान चळवळीतील कार्यकर्त्यांचे स्पष्ट मत आहे.

अंधश्रद्धेचा प्रचंड पगडा असल्याने नेत्रदानाबाबत आजही सर्व स्तरांमध्ये जागृती नाही. मृत्युपश्चात नेत्रदान केल्यास पुढील जन्मात अंधत्व येते अशी अजब अंधश्रद्धा समाजात आहे. पुनर्जन्म होत नाही. मोक्ष मिळत नाही अशीही अंधश्रद्धा समाजात आहे. देवाने जसे पाठवले तसेच जावे अशीही अनेकांची धारणा आहे. त्यामुळे नेत्रदान पुरेशा प्रमाणात होत नाही, असे नेत्रदान चळवळीत गेली ३४ वर्षे काम करणारे ठाण्यातील श्रीपाद आगाशे सांगतात. श्रीपाद व त्यांच्या पत्नी पुष्पा आगाशे व त्याचे दोन्ही मुले नेत्रदान चळवळीत काम करीत आहेत. नेत्रदानासाठी अधिक जागृतीची गरज असल्याचे आगाशे सांगतात. नेत्रदान कॅन्सर पेशंट, एचआयव्ही पेशंट, काविळ आणि डोळ्यांना जंतूसंसर्ग झालेले पेशंट करू शकत नाहीत.

**श्रीलंकेत १०० टक्के नेत्रदान**

श्रीलंकेत १०० टक्के नेत्रदान होते. या देशातील बौद्धधर्मीय मृत्युपश्चात १०० टक्के नेत्रदान करतात. कोलंबो इंटरनॅशनल आयबँकेमार्फत संपूर्ण जगाला नेत्र पुरवले जातात. या देशातून भारताला दरवर्षाला अंदाजे १० हजार नेत्र येतात.

**नेत्रदान म्हणजे डोळ्यांचा वैज्ञानिक पुनर्जन्म - डॉ. लहाने**

जे. जे. हॉस्पिटलचे डीन व नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. तात्याराव लहाने यांनीही नेत्रदानात अंधश्रद्धा हा मोठा अडसर असल्याचे सांगितले. नेत्रदान केल्याने पुनर्जन्म मिळत नाही, अशी अंधश्रद्धा समाजात आहे. पण मृत्यूनंतर सहा तासांपर्यंत नेत्रदान करता येते. मरणोत्तर नेत्रदान म्हणजे डोळ्यांचा वैज्ञानिक पुनर्जन्म असल्याचे डॉ. लहाने सांगतात.

# सावरगाव तांडा वस्तीतील विद्युत दाबाची समस्या अखेर मार्गी



प्रतिनिधी १० जून

## निलेश कापकर यांचा पुढाकार

**आलेगाव :** येथील तांडा वस्तीमध्ये गेल्या दहा वर्षांपासून कमी विद्युत दाबाची गंभीर समस्या होती. या समस्येमुळे ग्रामस्थांना दैनंदिन जीवनात मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. अखेर सामाजिक कार्यकर्ते निलेश कापकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे ही समस्या मार्गी लागली असून ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे.

सावरगाव येथील नागरिकांनी आपल्या भागातील विद्युत दाबाच्या समस्येबाबत निलेश कापकर यांच्याकडे व्यथा मांडली. ग्रामस्थांच्या अडचणीची गांभीर्याने दखल घेत कापकर यांनी कोणताही विलंब न करता काही ग्रामस्थांसह महावितरण विभाग तसेच पालकमंत्र्यांकडे पाठपुरावा सुरू केला. तांडा वस्तीतील कमी दाबाची समस्या कायमस्वरूपी सोडविण्यासाठी नवीन विद्युत रोहित्र ट्रान्सफॉर्मर बसविण्याची मागणी त्यांनी लावून धरली.

या मागणीची दखल घेत महावितरण विभाग आणि पालकमंत्री यांनी आवश्यक कार्यवाही करून सावरगाव तांडा वस्तीमध्ये नवीन विद्युत रोहित्र उपलब्ध करून दिले. त्यामुळे अनेक वर्षांपासून भेडसावत असलेली कमी विद्युत दाबाची समस्या अखेर दूर झाली आहे.

या कामामुळे ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, दहा वर्षांच्या त्रासातून सुटका झाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

# अकोल्यात आज पं. दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा

प्रतिनिधी १० जून

**अकोला :** नोकरी इच्छुक उमेदवारांना खासगी क्षेत्रातील नोकरीच्या संधी उपलब्ध व्हाव्यात याकरिता जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राद्वारे १० जूनला सकाळी १० वा. पं. दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात २ नामांकित कंपन्यांतील एकूण ३८ पदांची भरती करण्यात येत आहे. यामध्ये दहावी,बारावी, आयटीआय, पदवीधर उमेदवारांना संधी उपलब्ध आहेत. सदर मेळाव्यासाठी ऑनलाईन आवेदन करणे करिता https://rojgar.mahaswayam.gov.in/#/home/index या वेबपोर्टलच्या माध्यमातून ऑनलाईन माध्यमातून नोंदवावी व दिनांक १०/०६/२०२६ रोजी मुलाखतीसाठी प्लेसमेंट ड्राईव्ह (रोजगार मेळाव्यास) प्रत्यक्ष उपस्थित राहावे. पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्यास' ऑनलाईन सहभाग नोंदविण्यासाठी पुढील प्रक्रिया करावी. www.mahaswayam.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या. एम्प्लॉयमेंट टॅबवर क्लिक करा. जॉबसीकर हा पर्याय निवडून आपला सेवायोजन नोंदणी क्रमांक किंवा आधार क्रमांक व पासवर्ड वापरून साईन इन करा. आपल्या होम पेजवरील जॉब फेअर हा पर्याय निवडा. अकोला जिल्हा निवडून फिल्टर बटणावर क्लिक करा नंतर दिनांकित मेळावा दिसेल त्यासमोर असलेल्या ॲक्शन बटणाच्या खाली व्ह्यू आणि अप्लाय बटन दिसेल. त्यानंतर मेळाव्यास उपस्थित राहणारे उद्योजक व त्यांच्याकडील पदाबाबत माहिती दिसेल. आपल्या पात्रतेनुसार पदाची निवड करून अप्लाय बटणावर क्लिक करा. आय ॲग्री हा पर्याय निवडा. दिनांक १० जून २०२६ रोजी जास्तीत जास्त नोकरी इच्छुक उमेदवारांनी आपला बायोडाटा, शैक्षणिक कागदपत्रे, तसेच पासपोर्ट साईज फोटो व इतर आवश्यक कागदपत्रासह जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, दुसरा मजला, प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, अकोला येथे स्वखर्चाने उपस्थित राहून संधीचा लाभ घ्यावा. मेळाव्यासंबंधित अधिक माहिती करिता या कार्यालयाच्या दूरध्वनी क्रमांक ०७२४-२४३३८४२ किंवा ७०२४२४१०९८ / ९४२१४२५०६६ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन सहाय्यक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अकोला यांनी केले आहे.

# रोड सेफ्टी व्हिजन वाहनाद्वारे पीएम राहत व राहवीर योजनेची प्रसिद्धी करा

प्रतिनिधी १० जून

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे निर्देश



**अकोला :** राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी अकोला प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वतीने रस्ता सुरक्षा विषयक जनजागृतीबाबत राबविण्यात येणाऱ्या'रोड सेफ्टी व्हिजन'वाहनाची पाहणी करीत रोड सेफ्टी व्हिजन वाहनाची सविस्तर माहिती घेतली.या वाहनाद्वारे रस्ता सुरक्षासह ऑटोचालकांना मराठी भाषेच्या वापराबाबत मार्गदर्शन करण्यात येत आहे. रोड सेफ्टी व्हिजन वाहनाच्या माध्यमातून ऑटोचालकांसाठी मराठी भाषेचे प्रशिक्षण अधिक प्रभावीपणे राबविणे, तसेच 'पीएम राहत' व 'राहवीर' योजनांबाबत व्यापक जनजागृती करणे, आणि शासनाच्या विविध योजनांचा प्रसार करण्याबाबत सूचना दिल्या.

# धामणदरीत वाढत आहे किडनीचे आजार

प्रतिनिधी १० जून

## आरओ प्रकल्पासाठी जोरदार मागणी



**अकोला :** बार्शीटाकळी तालुक्यातील धामणदरी गावातील पिण्याच्या पाण्यात वाढलेल्या क्षाराच्या प्रमाणामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला असून गावात किडनीसंबंधित आजारांचे प्रमाण वाढत असल्याची चिंता ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. अनेक वर्षांपासून नागरिकांना खारट व क्षारयुक्त पाणी पिण्याची वेळ येत असल्याने विविध आरोग्यविषयक समस्यांमध्ये वाढ होत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. विशेषतः किडनीसंबंधित आजारांनी त्रस्त असलेल्या रुग्णांची संख्या वाढत असल्यामुळे गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या गंभीर समस्येची दखल घेत धामणदरी ग्रामस्थांच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते अक्षय राठोड यांनी पंचायत समिती बार्शीटाकळीचे गटविकास अधिकारी (BDO) यांना निवेदन सादर करून धामणदरी गावात तात्काळ ंध पाणी शुद्धीकरण प्रकल्प मंजूर करण्याची मागणी केली आहे.

गावातील नागरिकांना स्वच्छ व सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. धामणदरी गावातील नागरिक अनेक वर्षांपासून याच पाण्याचा वापर करत असून त्याचा आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. किडनीसंबंधित आजारांसह इतर शारीरिक व्याधींमध्ये वाढ होत असल्यामुळे ग्रामस्थांमध्ये मोठ्या प्रमाणात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. स्वच्छ पिण्याचे पाणी हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत हक्क असून आजही धामणदरीतील नागरिकांना दूषित व क्षारयुक्त पाणी पिण्याची वेळ येत असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. याबाबत बोलताना अक्षय राठोड यांनी सांगितले की, 'धामणदरी गावातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. अनेक वर्षांपासून ग्रामस्थांना खारट पाण्याचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे गावातंध पाणी शुद्धीकरण प्रकल्प उभारणे ही काळाची गरज आहे. प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहून तात्काळ कार्यवाही करावी.' अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. ग्रामस्थांनी निवेदनात असेही नमूद करण्यात केले आहे की, सध्या उपलब्ध असलेल्या क्षारयुक्त पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्याची मोठ्या प्रमाणात हानी होत असून भविष्यात कोणत्याही नागरिकाच्या आरोग्यावर गंभीर परिणाम झाल्यास अथवा जीवितहानी झाल्यास त्याची नैतिक व प्रशासकीय जबाबदारी संबंधित प्रशासन व जबाबदार यंत्रणांवर राहील. तसेच या मागणीवर तात्काळ कार्यवाही न झाल्यास गावकरी आंदोलनाचा पवित्रा उचलणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

# शहरात प्रथमच उमेदच्या महिलांची भरारी



प्रतिनिधी १० जून

**हिवरखेड :** ग्रामीण भागातील महिलांनी एकत्र येऊन, स्वतःचा व्यवसाय सुरू करावा आणि आर्थिक स्वावलंबनाकडे पाऊल टाकावे, या उद्देशाने या किराणा दुकानाची स्थापना करण्यात आली आहे. 'भरारी संघ' च्या माध्यमातून महिलांनी एकत्र येत हा व्यवसाय सुरू केला आहे, ज्यामुळे गावातील नागरिकांना एकाच छताखाली सर्व दर्जेदार आणि जीवनावश्यक किराणा माल रास्त दरात उपलब्ध होणार आहे.

या उद्घाटन सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून उमेद अभियानाचे वरिष्ठ जिल्हा व्यवस्थापक नरेंद्र काकड सर , उपाध्यक्षा प्रतिभाताई येऊल तसेच अकोट विधान सभा विस्तारक रमेश दुतोंडे तसेच राजू तायवाडे, प्रवीण चोडके, पोलिस पाटील प्रकाश गावंडे, नगरसेवक वैभव गावंडे , किरण सेदानी, संदीप इंगळे, धीरज बजाज केशव कोरडे , अर्जुन खिरोडकर, रितेश टिलावत, गोवर्धन गावंडे, गजानन राठोड, तसेच प्रभाग संघाचे अध्यक्ष सविता पंचबुद्धे, सचिव उषा राठोड अश्विनी ठाकरे, भरारी ग्राम संघाचे अध्यक्ष प्रिया राठी तसेच सचिव अर्चना गावंडे, सविता वसु उपस्थित होते.स्थानिक प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन आणि आभार संगीता इंगोले यांनी मानले.

## दिन विशेष

# उद्योग आणि व्यापार क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान



राहुल बजाज यांची आज जयंती

राहुल बजाज यांचा जन्म, सावित्री आणि कमलनयन बजाज या मातापित्यांच्या पोटी, कलकत्ता येथे १० जून १९३८ रोजी मारवाडी कुटुंबात झाला. व्यावसायिक असलेल्या या मारवाडी कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अतिशय संपन्न होती. ते बजाज ग्रुप उद्योग समूहाचे चेरमन व भारतीय संसदेच्या राज्यसभेचे सदस्य होते. त्यांना २००१ साली पद्मभूषण या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

रूपा घोलप या महाराष्ट्रीयन तरुणीशी १९६१ साली राहुल यांचा विवाह झाला. रूपा या त्या काळातील सौंदर्यवती व नवोदित मॉडेल होत्या. राहुल व रूपा यांना राजीव (जन्म - १९६६), संजीव (जन्म - १९६९), सुनयना केजरीवाल (जन्म-१९७१) ही तीन मुले आहेत. हे भारतामधील एक उद्योजक आहेत. बजाज ऑटो या कंपनीचे ते संचालक आहेत. औद्योगिक क्षेत्रातील कामगिरीबद्दल त्यांना इ.स. २००१ साली पद्मभूषण पुरस्काराने गौरवण्यात आले. दरम्यानच्या काळात राहुल बजाज यांचे पुत्र राजीव बजाज आणि संजीव बजाज बजाज कंपनीच्या व्यवस्थापनामध्ये प्रवेश केला. त्यांची मुलगी सुनयना यांचा विवाह तेमाझेक इंडिया चे माजी प्रमुख मनीष केजरीवाल यांच्याशी झाला.

राहुल बजाज यांचे आजोबा जमनालाल बजाज हे भारतीय स्वातंत्र्य सैनिक होते. राहुल यांच्या आजोबांना महात्मा गांधी आपला पाचवा पुत्र मानत असत. जमनालाल बजाज हे जवाहरलाल नेहरू यांचेही खूप जवळचे मित्र होते. काँग्रेस पक्षाच्या उभारणीत व राष्ट्रीय चळवळीत त्यांचे योगदान महत्वाचे होते. बजाज आणि नेहरू या घराण्याचे गेल्या तीन पिढ्यांचे कौटुंबिक संबंध आहेत. कमलनयन आणि इंदिरा गांधी दोघे काही काळ एकाच विद्यालयात शिकत होते. कमलनयन यांच्या पहिल्या अपत्याचे राहुल हे नाव स्वतः जवाहरलाल नेहरू यांनी सुचवलेले आहे. राहुल यांचे बालपण अतिशय शिस्तीच्या वातावरणात गेले. कमलनयन बजाज हे महात्मा गांधींच्या वर्ध्यातील संन्याशी आश्रमात वाढले.

राहुल यांचे शालेय शिक्षण मुंबईतील प्रतिष्ठित अश्या कॅथेड्रल आणि जॉन कॉनॉन या शाळांमधून झाले. त्यांनी १९६८ साली दिल्लीतील सेंट स्टीफन महाविद्यालयातून इकॉनॉमिक्स विषय घेऊन बी.ए (ऑनर्स )ही पदवी मिळवली. मुंबईत परतल्यावर, दोन वर्ष सकाळी सरकारी विधी महाविद्यालयात कायद्याचा अभ्यास करता करता बजाज इलेक्ट्रॉनिकस मध्ये उमेदवारी केली. १९६४ साली त्यांनी हार्वर्ड विद्यापीठाची व्यवस्थापन क्षेत्रातील (एम.बी.ए.) पदवी प्राप्त केली. १९६५ साली ते बजाज ग्रुप चे चेरमन झाले. २००५ साली चेरमन पदावरून पायउतार झाले. त्याचे पुत्र राजीव हे बजाज ग्रुप चे व्यवस्थापकीय संचालक झाले. राहुल बजाज हे २००६ ते २०१० या दरम्यान राज्यसभेचे सदस्य म्हणून निवडून गेले. २०१६ च्या फोर्ब्ज च्या जगातील श्रीमंत लोकांच्या यादीमध्ये राहुल बजाज हे ७२२ व्या क्रमांकावर होते.

२००१ साली भारत सरकारने राहुल बजाज यांना उद्योग आणि व्यापार क्षेत्रातील योगदानासाठी पद्मभूषण या पुरस्काराने सन्मानित केले. फ्रान्स सरकारने 'नाइट ऑफ द नॅशनल ऑर्डर ऑफ द लीजन ऑफ ऑनर' या सर्वोच्च नागरिक सन्मान देऊन सन्मानित केले.

# जीएमसी मधील वार्ड क्रं.32 मध्ये ॲडमिट अनोळखी रुग्णाची ओळख पटविण्याचे आवाहन

प्रतिनिधी १० जून



**अकोला :** दिनांक १४/०५/२०२६ रोजी पासून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, अकोला येथील वार्ड क्रमांक ३२ मध्ये एक अनोळखी पुरुष रुग्ण वय अंदाजित ३० वर्ष रुग्णालय नोंदणी क्रमांक १७७७०१ यांच्यावर मेडिसिन विभाग अंतर्गत उपचार सुरु आहेत. रुग्ण स्वतःचे नाव ओमप्रकाश असे सांगतो, बाकीची आणखी माहिती पेशंट देत नाही आहे, फक्त डोळ्याने पाहतो, त्यामुळे नातेवाईकांची माहिती मिळत नाही आहे, रुग्ण झोपूनच आहे त्याला स्वतःचे काहीही करता येत नाही, पोस्ट ऑफिस चौकाजवळून अकोला शहर पोलीस गस्तीवर असणाऱ्या पोलिसांनी सदर रुग्णाला उपचारासाठी भरती केले आहे अशी माहिती मिळाली आहे, सदर रुग्णाची कोणालाही ओळख पटल्यास किंवा नातेवाईक असल्यास त्यांनी रुग्णाची ओळख पटविण्यासाठी सर्वोपचार रुग्णालयाचे समाजसेवा अधीक्षक लक्ष्मीकांत शिंगोटे (८३८०८३०१८२) यांच्याशी संपर्क करावा.

# उज्वला योजनेतील अनुदानित गॅस सिलेंडरचा निर्णय मागे घेऊन पुन्हा 9 सिलेंडर द्या - जावेद जकारिया



**अकोला :** प्रदेश संघटक सचिव जावेद ज़करिया यांनी भारताचे पंतप्रधान यांना पत्र पाठवून प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेअंतर्गत अनुदानित गॅस सिलेंडरांच्या संख्येत करण्यात आलेल्या कपातीचा तीव्र निषेध नोंदविला आहे. हा निर्णय गरीब, मजूर, निम्न व मध्यमवर्गीय कुटुंबांवर अन्याय करणारा असल्याचे सांगत त्यांनी हा निर्णय तात्काळ मागे घेऊन अनुदानित गॅस सिलेंडरांची संख्या पुन्हा वर्षाला ९ करण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश संघटन सचिव जावेद जकारिया यांनी केली आहे.

पंतप्रधानांना पाठविलेल्या पत्रात जावेद ज़करिया यांनी म्हटले आहे की, केंद्र सरकारने २०१६ मध्ये प्रधानमंत्री उज्ज्वला योजना सुरू करून गरीब कुटुंबांतील महिलांना धुरापासून मुक्ती मिळावी व स्वच्छ इंधन उपलब्ध व्हावे, यासाठी स्तुत्य उपक्रम राबविला होता. योजनेच्या सुरुवातीच्या काळात लाभार्थींना वर्षाला १२ अनुदानित गॅस सिलेंडर दिले जात होते. त्यानंतर ऑगस्ट २०२५ पासून ही संख्या कमी करून ९ करण्यात आली आणि आता ८ जून २०२६ रोजी घेतलेल्या निर्णयानुसार ती आणखी कमी करून केवळ ४ सिलेंडर प्रति वर्ष करण्यात आली आहे.

ते म्हणाले की, वाढत्या महागाईच्या काळात घरगुती गॅस, अन्नधान्य, वीज, शिक्षण आणि आरोग्य सेवांचा खर्च सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर जात आहे. अशा परिस्थितीत उज्ज्वला योजनेच्या लाभार्थींना मिळणाऱ्या अनुदानात कपात करणे म्हणजे गरीब कुटुंबांच्या अडचणींमध्ये भर घालण्यासारखे आहे. एका सामान्य कुटुंबासाठी संपूर्ण वर्षभर फक्त ४ गॅस सिलेंडरवर घर चालविणे शक्य नाही. ग्रामीण भागातील तसेच शहरी झोपडपट्ट्यांमधील कुटुंबांमध्ये सदस्यसंख्या अधिक असल्याने गॅसचा वापरही जास्त प्रमाणात होतो. जावेद ज़करिया यांनी सांगितले की, गरीब कुटुंबांना पुरेशा प्रमाणात अनुदानित सिलेंडर मिळाले नाहीत तर त्यांना पुन्हा लाकूड, कोळसा आणि इतर पारंपरिक इंधनांचा वापर करावा लागेल. यामुळे महिलांच्या व लहान मुलांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होईल आणि उज्ज्वला योजनेचा मूळ उद्देशही धोक्यात येईल.

केंद्र सरकार गरीब, मजूर, शेतकरी आणि वंचित घटकांच्या भावना लक्षात घेऊन हा निर्णय मागे घेईल आणि उज्ज्वला योजनेच्या लाभार्थींना दिलासा देईल, असा विश्वास जावेद ज़करिया यांनी व्यक्त केला.

# साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर **८३९०६७०९९९** या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.

त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

सिटी न्यूज अकोला
बुधवार दि. १० जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## गुरुदेवांच्या जन्मोत्सव निमित्त आनंद अनुभूती शिबीर

**बाळापूर :** गुरुदेवांच्या ७० व्या जन्मोत्सवानिमित्त बाळापूर आर्ट ऑफ लिव्हिंग शहर व ग्रामीण यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीराम मंगल भवन, श्रीराम मंदिर, बाळापूर येथे आनंद अनुभूती शिबिर आयोजित करण्यात आले होते.

वरिष्ठ प्रशिक्षक संजय भैय्या गाडेकर यांच्या सानिध्यात ४९९ शिबिरार्थ्यांनी लाभ घेतला. या शिबिराला शहर व ग्रामीण येथील साधकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत शिबिराचा लाभ घेतला. शिबिराला शेगाव येथील सौ. सपना दीदी शर्मा, बाळापूर येथील सुधीर घाटोळ व सौ. निशा सुधीर घाटोळ यांचे मोलाचे मार्गदर्शन, तसेच प्रशांत साबळे, अजय डवरे, राहुल तराळे यांचे सहकार्य लाभले.



# भक्ती माधवाला अतिप्रिय : सुदर्शनजी शर्मा शास्त्री





## गोकुळ धाममध्ये तृतीय पुष्प गुंफले

प्रतिनिधी १० जून

**अकोला :** ईश्वर कशाने प्रसन्न होतो, याचे अगदी सोपे उत्तर आहे भक्ती. माधवाला अतिप्रिय अशी भक्ती आहे. त्यामुळे परमेश्वराच्या भक्तीत लीन व्हा असा उपदेश कथा वाचक पंडीत सुदर्शन शर्मा शास्त्री यांनी उपस्थित श्रोत्यांना केला. रूप, धन, बळ, जाती या गोष्टी मिथ्या आहेत. ईश्वराला भाव, भक्ती सर्वात प्रिय आहे. नित्य कर्म करताना नामस्मरण करणे भवसागर तरून जाण्याचा मार्ग आहे असे शास्त्रीजी म्हणाले.

गोरक्षण मार्गावर दत्त कॉलनीत देशमुख परिवाराच्या वतीने पुरुषोत्तम मासा निमित्त आयोजित भागवत महापुराणाचे तिसरे पुष्प सुदर्शन शर्मा शास्त्री यांनी गुंफले. कै. पुंडलिकराव बंकटराव उपाख्य अण्णासाहेब देशमुख यांच्या स्मरणार्थ भागवत कथा होत आहे. मंगळवारी कथेपूर्वी यजमान पंकज देशमुख, सौ. ऋतुजा देशमुख, सौ. कल्पनाताई देशमुख यांनी भागवत ग्रंथाचे पूजन केले. सुदर्शन शास्त्री यांचे स्वागत केले. आरती नंतर कथेला आरंभ झाला. भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मन अतिशय चंचल आहे. त्यामुळे मनाला ताब्यात ठेवणे आवश्यक आहे असे सांगून सुदर्शन शर्मा म्हणाले, शास्त्र सांगते चार गोष्टी महत्त्वाच्या आहेत. आसनाला जिंकायचे, श्वासाला नियंत्रित करा, सत्संग ठेवा आणि इंद्रियांना ताब्यात ठेवा. यासाठी संयम आवश्यक आहे. इकडे शुकदेवांचे आगमन शुकताल येथे परीक्षित यांच्याकडे झाले आहे. शुकदेव परीक्षिताला म्हणाले, सात दिवसात तुम्हाला मोक्ष मिळेल. असे सांगण्याचे सामर्थ्य व्यास पुत्र शुकदेवात आहे. तसेच ज्यांना मोक्ष हवा त्यांनी भागवत कथा श्रवण केली पाहिजे. तुम्ही देखील हा मार्ग अनुसरा असा सल्ला शुकदेवाने दिला. विविध दाखले देऊन भागवत कथेची महती शास्त्रीजींनी सांगितली .

### ध्रुव आणि नृसिंह चरित्र दाखवतात भक्तीचा मार्ग

देवाच्या भक्तीमुळे मानवी जीवनात सुख, शांती आणि ऐश्वर्य प्राप्त होते. भगवद्गीतेनुसार भक्ती करण्यासाठी कोणत्याही विशिष्ट वयाची आवश्यकता नसते, याचे सर्वोत्तम उदाहरण म्हणजे ध्रुव चरित्र होय. असे उद्गार भागवताचार्य पंडित सुदर्शन शर्मा यांनी व्यक्त केले.भगवान श्रीकृष्णाच्या विविध दिव्य लीलांचे वर्णन केले. त्यांनी ध्रुव चरित्र, कपिलोपाख्यान, अजामिलोपाख्यान आणि भगवान नृसिंह अवताराची कथा सविस्तर सांगताना स्पष्ट केले की, दृढ श्रद्धा, अढळ विश्वास आणि निष्काम भक्तीमुळे भगवंताची कृपा सहज प्राप्त होते.ते म्हणाले की, बालक ध्रुवाने अगदी लहान वयात कठोर तपस्या करून देवाला प्रसन्न केले, तर दुसरीकडे प्रल्हादाने विपरीत परिस्थितीतही देवाचे स्मरण सोडले नाही. नृसिंह अवताराची कथा हा संदेश देते की, भगवान आपल्या भक्तांच्या रक्षणासाठी कोणत्याही रूपात प्रकट होऊ शकतात. नरसिंह, ध्रुव आणि हिरण्यकश्यपू वधाचा देखावा सादर करण्यात आला. संजय भाऊ देशमुख आणि सौ. स्वप्नाली देशमुख यांनी भगवान नरसिंहाचे पूजन केले. भाविकांची मोठी गर्दी होती.

## सीईओ अनिता मेश्राम यांची बदली; मनरेगा आयुक्तपदाची जबाबदारी

प्रतिनिधी १० जून



**अकोला :** जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम यांची अवघ्या १३ महिन्यात बदली करण्यात आली असून, त्यांची महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. राज्य शासनाने मंगळवारी यासंदर्भातील आदेश जारी केले. दरम्यान, त्यांच्या जागी कोणत्या अधिकाऱ्याची नियुक्ती होणार याबाबत अद्याप स्पष्टता आलेली नाही.

९ एप्रिल २०२५ रोजी अकोला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदाची सूत्रे स्वीकारलेल्या मेश्राम यांनी आपल्या कार्यकाळात विविध विकास योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीवर भर दिला. ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा, शासकीय योजनांचा लाभ तळागाळापर्यंत पोहोचविणे तसेच प्रशासनातील समन्वय वाढविण्याच्या दृष्टीने त्यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या कार्यकाळातील महत्त्वाच्या उपक्रमांपैकी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रामीण प्रतिभा विकास योजना' विशेष उल्लेखनीय ठरली. ग्रामीण भागातील गुणवंत विद्यार्थ्यांना नीट आणि जेईई सारख्या स्पर्धात्मक परीक्षांसाठी मोफत प्रशिक्षण उपलब्ध करून देण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय जिल्हा परिषदेमार्फत घेण्यात आला. या योजनेसाठी अंदाजपत्रकात सुमारे १ कोटी २० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

मेश्राम यापूर्वी महाराष्ट्र राज्य मत्स्योद्योग विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक म्हणून कार्यरत होत्या.

विशेष म्हणजे, मेश्राम यांच्या आधी मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या बी. वैष्णवी यांचीही बदली नागपूर महानगरपालिकेत अतिरिक्त आयुक्त म्हणून झाली होती. त्यामुळे सलग दुसऱ्यांदा अकोला जिल्हा परिषदेच्या सीईओ पदावरून नागपूरकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती झाल्याची चर्चा प्रशासकीय वर्तुळात रंगली आहे.

## आज अडगांव बु. ग्रामपंचायतीची प्रभागनिहाय आरक्षण सोडत

प्रतिनिधी १० जून

**अडगांव बु. :** २०२६ मधे मुदत संपलेल्या तेल्हारा तालुक्यातील ३३ ग्रामपंचायत च्या प्रभाग निहाय आरक्षण सोडतीचा कार्यक्रम प्रशासनाकडुन जाहीर करण्यात आला त्यानुसार तालुक्यातील अत्यंत महत्त्वाची आणि राजकीयदृष्ट्या संवेदनशील समजल्या जाणाऱ्या अडगांव बु ग्रामपंचायतीच्या प्रभागनिहाय आरक्षण सोडतीचा बिगुल अखेर वाजला आहे. येत्या १० जून रोजी स्थानिक ग्रामपंचायत कार्यालयात सकाळी १० वा. विशेष ग्रामसभेचे आयोजन करून ही आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे. तहसील प्रशासनासह ग्रामपंचायत यंत्रणा या प्रक्रियेसाठी पूर्णपणे सज्ज झाली असून, संपूर्ण गावचे डोळे आता या सोडतीकडे लागले आहेत.

अडगांव बु. येथे एकूण ६ प्रभाग असून, एकूण १७ सदस्य संख्या आहे. नियमानुसार यातील ५०३ जागा महिलांसाठी राखीव असणार आहेत. १० जूनला नेमक्या कोणत्या प्रभागात कोणते आरक्षण निघणार, यावर आतापासूनच चावडीवर आणि गल्लोगल्लीत राजकीय खलबते सुरू झाली आहेत. आपल्या प्रभागात काय परिस्थिती राहील, या चिंतेने इच्छुकांची धाकधूक वाढवली आहे. सरपंच पद ओबीसी महीला करीता राखीव गेले असल्याने पुन्हा महिलांच्या हातात गांवचा कारभार राहणार आहे. यंदाच्या निवडणुकीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे सरपंचपदाची निवड थेट जनतेतून होणार आहे. थेट निवडणुकीमुळे गावच्या राजकारणातील चुरस कमालीची वाढली असुन गावात अद्याप अधिकृत निवडणूक जाहीर झालेली नाही, मात्र गावाचे भावी 'कारभारी' आणि 'कारभारणी' जवळपास निश्चित झाले आहेत. यंदाच्या निवडणुकीत प्रत्यक्ष गाठीभेटीं इतकेच 'सोशल मीडिया' हे प्रचाराचे मुख्य माध्यम ठरताना दिसत आहे. गावातील प्रत्येक व्हॉट्सअॅप ग्रुप आणि फेसबुकवर इच्छुकांकडून आणि त्यांच्या कार्यकर्त्यांकडून आपली बाजू भक्कमपणे मांडण्याची चुरस रंगली आहे. १० जूनच्या आरक्षण सोडतीनंतर गावच्या राजकारणाचे चित्र अधिक स्पष्ट होईल, तोपर्यंत सोशल मीडियावरील हे 'राजकीय वारे' अधिक गतिमान होणार, हे मात्र नक्की!

### इच्छुकांची धाकधूक वाढली




## अघोषित वीजखंडितीने अकोटकर त्रस्त; पाणीपुरवठाही विस्कळीत

**अकोट :** गेल्या दोन महिन्यांपासून अकोट शहरात वारंवार होणाऱ्या वीजखंडितीमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. दिवसभरात अनेकवेळा वीजपुरवठा खंडित होत असल्याने उष्णतेच्या कडाक्यात नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. महावितरणच्या नियोजनशून्य कारभाराबाबत शहरवासीयांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

रविवारी (७ जून) सकाळी देखभाल-दुरुस्तीच्या कामासाठी वीजपुरवठा बंद करण्यात आला होता. मात्र अपेक्षित वेळेपेक्षा अधिक काळ वीज नसल्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पाणीपुरवठा योजनेवर परिणाम झाला. जलकुंभ पूर्ण क्षमतेने भरता न आल्याने शहराचा पाणीपुरवठा एक दिवस पुढे ढकलावा लागला. संपूर्ण आकोट शहर परिसरात वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याच्या तक्रारी आहेत. पावसाळा तोंडावर असतानाही झाडांच्या फांद्या छाटणे, जीर्ण तारा व यंत्रणा दुरुस्त करण्याची कामे अद्याप सुरू असल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

अघोषित वीजखंडिती, जुनाट यंत्रणा आणि विस्कळीत नियोजनामुळे शहरवासीयांना अंधारासह पाणीटंचाईचाही सामना करावा लागत असून महावितरणने तातडीने सुधारणा करावी, अशी मागणी होत आहे.

## प्रवासी निवारा की गुरांचा गोठा

प्रतिनिधी १० जून




**मुर्तीजापूर :** मुर्तीजापूर दर्यापूर रोडवर स्थित पुंडलिक नगर येथे ए. टी. महामंडळाने बांधण्यात आलेला प्रवासी निवाऱ्याला गुरांच्या गोठ्याचे स्वरूप आले असून हा प्रवाशी निवारा की गुरांचा गोठा असा प्रश्न प्रवाशांना पडला असून संबंधीत विभागाचे मात्र याकडे दुर्लक्ष होत आहे.

मुर्तीजापूर ते दर्यापूर मार्गावर मुर्तीजापूर पासून दोन अडीच कि. मी. अंतरावर प्रख्यात संत परमहंस पुंडलिक महाराज संस्थान असून येथे नियमितपणे साजऱ्या होणाऱ्या विविध धार्मिक कार्यक्रम यात्रा महोत्सव महाराष्ट्र तसेच राज्याबाहेरून लाखो भक्तांची मंदीयाळी असते. यास्तव भक्तांचे सोयीसाठी येथे एस. टी. महामंडळाने विनंती वरून बस थांबा दिला. कालांतराने येथे प्रवाशी निवारा सुध्दा बांधण्यात आला. यवतमाळ वाशिम कारंजा तसेच परतवाडा अचलपूर अकोट दर्यापूर मार्गावरील भक्तांची या थांबल्यामुळे विशेषसोय झाली असून रेल्वे मार्गावरील बरेच प्रवासी देखील मुर्तीजापूर दर्यापूर बसने येतात सर्व बसेस देखील येथे थांबतात. प्रवाशी निवाऱ्यामुळे ऊन वारा पाऊस यापासून प्रवाशांची सोय होते मात्र काही दिवसापासून या निवाऱ्याचा वापर चक्क गोठ्या सारखा होत असून अस्वच्छता पसरली आहे. याकडे महामंडळाच्या संबंधीत विभागाचे दुर्लक्ष होत आहे का असा प्रश्न प्रवाशांना पडला असून वरिष्ठांनी याकडे लक्ष देण्याची मागणी करण्यात येत आहे.

## कुष्ठरोग शोध मोहीम सुरू

**अकोला :** राज्यात सन २०२७ पर्यंत शून्य कुष्ठरुग्ण प्रसाराचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार सार्वजनिक आरोग्य यंत्रणेतर्फे जिल्ह्यात कुष्ठरुग्ण शोध मोहिमेचा प्रारंभ झाला. जिल्ह्यातील मागील पाच वर्षांमध्ये एकही कुष्ठरुग्ण आढळून न आलेल्या ५११ गावांमध्ये विशेष घरोघर सर्वेक्षणास सुरुवात करण्यात आली आहे. या मोहिमेअंतर्गत एकूण ४ लाख ४ हजार ८६३ लोकसंख्येची तपासणी करण्याचे नियोजन करण्यात आले असून आरोग्य कर्मचारी घरभेटी देत नागरिकांची कुष्ठरोगासंदर्भात तपासणी करीत आहेत.

## भारताला परमवैभव प्राप्त करून देण्यासाठी कार्य करा

प्रतिनिधी १० जून

### आरती तिवारी यांचे बाल सेविकांना आवाहन



**अकोला :** हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज, स्वामी विवेकानंद, चंद्रशेखर आझाद आणि डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी बालपणीच भारताला भाग्य विधाता बनविण्याचे स्वप्न पाहिले व ते पुढे खरे केले. आपण देखील भारतमातेला परमवैभव प्राप्त करून देण्यासाठी कार्य करावे असे आवाहन

आरती तिवारी यांनी केले.

राष्ट्र सेविका समितीच्या प्रशिक्षण वर्गाचा समारोप करताना त्या बोलत होत्या. या वर्गास छोट्या सेविकांनी प्रथमच समितीचा गणवेश घातला होता. ते पाहून तिवारी म्हणाल्या की, भारत भाग्य विधाता बनविण्याकडे हे तुमचे पहिले पाऊल आहे. मुख्य शिक्षिका स्नेहल ठोकळ अकोला, आचल मिश्रा, अकोला विभाग कार्यवाहिका ज्योती जोशी, चंद्रपूर विभाग कार्यवाहिका अंजली हिरुळकर, वर्ग कार्यवाहिका शुचिता जोशी यांची उपस्थिती होती. समारोप सत्रात मूर्तिजापूरच्या आर्या ठाकरे हिने श्लोक, आकोटच्या रसिका पाटील हिने अमृतवचन, बोरगाव मंजूच्या माधुरी दीपके हिने परिचय करून दिला तर ध्रुवी कुळकर्णी हिने वैयक्तिक गीत गायिले तर ईश्वरी पुरी हिने प्रार्थना गायन केले.

१ ते ७ जून या कालावधीत झालेल्या प्रारंभिक वर्गात १० स्थानांवरून ६५ सेविका सहभागी झाल्या. वर्गात सेविकांच्या अंगभूत गुणांचा विकास व्हावा पासाठी विविध शारिरीक, बौद्धीक विषयांचे प्रशिक्षण देण्यात आले. पर्यावरण दिनानिमित्त ५ जून रोजी माहिती देण्यात आली. त्या अंतर्गत पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही.

## ११ वर्षीय विराट वर्माचे आकस्मिक निधन

प्रतिनिधी १० जून



**मुर्तीजापूर :** शहरातील मनोज ज्वेलर्सचे संचालक सुमित वर्मा यांचे सुपुत्र विराट वर्मा (वय ११ वर्षे) यांचे उपचारादरम्यान पुणे येथे निधन झाले. या दुःखद घटनेमुळे शहरात हळहळ व्यक्त करण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, उन्हाळ्याच्या सुट्टीत विराट आपल्या नातेवाईकांच्या घरी फिरण्यासाठी गेला होता. यावेळी पोहण्याचा आनंद घेत असताना त्याच्या पोटात पाणी गेल्याने त्याची प्रकृती अचानक बिघडली. कुटुंबीयांनी तातडीने त्याला पुणे येथील रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांकडून सर्वतोपरी उपचार करण्यात आले, मात्र प्रकृती अत्यंत गंभीर झाल्याने उपचारादरम्यान ८ जून रोजी रात्री त्याची प्राणज्योत मालवली. विराट हा अत्यंत हुशार, मनमिळावू व सर्वांचा लाडका मुलगा होता. सामाजिक कार्यकर्ते सुमित वर्मा यांच्या कुटुंबावर ओढवलेल्या दुःखद प्रसंगामुळे सर्वस्तरांतून शोकसंवेदना व्यक्त करण्यात येत आहेत.

# अन्न व औषधांच्या गुणवत्तेची तपासणी करा

प्रतिनिधी १० जून

### अकोटकरांची अन्न व औषध प्रशासनाकडे मागणी



**अकोट :** शहरातील हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, मिठाई दुकाने, दूध डेअरी, भोजनालये, आरओ पाणी प्रकल्प तसेच मेडिकल स्टोअर्समधील अन्नपदार्थ व औषधांच्या गुणवत्तेची नियमित तपासणी करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. नुकत्याच एका मेडिकल स्टोअरवर झालेल्या कारवाईनंतर अन्न व औषध प्रशासनाने इतर प्रतिष्ठानांचीही तपासणी करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

अन्नपदार्थांची गुणवत्ता, स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची शुद्धता तसेच औषध विक्री केंद्रांमधील नियमांचे पालन याबाबत नियमित पाहणी करण्याची गरज नागरिकांनी व्यक्त केली आहे.

नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित बाबींमध्ये कोणतीही तडजोड होऊ नये यासाठी विशेष तपासणी मोहीम राबवून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

### भाजीपाला व फळविक्रेत्यांवरही लक्ष हवे

शहरातील भाजीपाला व फळ बाजारात दररोज मोठ्या प्रमाणात खरेदी-विक्री होत असते. उघड्यावर विक्री, स्वच्छतेचा अभाव तसेच काही ठिकाणी रासायनिक पदार्थांच्या वापराबाबत शंका व्यक्त केली जात असल्याने भाजीपाला व फळांच्या गुणवत्तेचीही नियमित तपासणी करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने या विक्रेत्यांवरही प्रभावी देखरेख ठेवण्याची आवश्यकता व्यक्त होत आहे.

### नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न

अन्नपदार्थ, पिण्याचे पाणी आणि औषधे यांचा थेट संबंध नागरिकांच्या आरोग्याशी आहे. त्यामुळे केवळ तक्रारींची वाट न पाहता अन्न व औषध प्रशासनाने नियमित तपासण्या करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचालित एफ 5226
मॉं. गायत्री प्राथमिक शाळा व
स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय
गायत्री नगर. अकोला
आम्ही गुणवत्ता पाहून प्रवेश देत नाही तर, प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता निर्माण करतो!

वैशिष्ट्ये :
- अनुभवी शिक्षकवृंद
- सुसज्ज पायाभूत ईमारत
- दर्जेदार अभ्यासक्रमासोबत नाविण्यपूर्ण उपक्रम
- सर्व पुस्तकांनी युक्त वाचनालय
- आनंददायी शिक्षण पध्दती
- CCTV ची सुविधा
- कला, संस्कृती, क्रिडा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासावर भर
- सुसज्ज प्रयोगशाळा

इयत्ता 1 ली ते 10 वी साठी प्रवेश देणे सुरु आहे.
- इयत्ता 1 ली ते 8 वी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश
- इयत्ता 1 ली ते 10 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा उपलब्ध
- शालेय पोषण आहार



पत्ता : मॉ गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय
मो. 9921186715, 9511254959, 9421895790,9960437366

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
बुधवार, दि. १० जून २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

## पुसद बसस्थानक परिसरातील अवैध वाहतुकीवर कारवाईची मागणी

प्रतिनिधी १० जून

**पुसद :** बसस्थानक परिसरातील वाढती वाहतूक कोंडी, प्रवाशांना होणारा त्रास आणि अवैध प्रवासी वाहतुकीमुळे नागरिकांनी कडक कारवाईची मागणी केली आहे.

बसस्थानकाच्या २०० मीटर परिसरातील नो-पार्किंग झोनमध्ये खासगी वाहने उभी करून प्रवाशांची अवैध वाहतूक केली जात असल्याने एसटी बसच्या वाहतुकीलाही अडथळे निर्माण होत आहेत.

जयस्वाल गॅस एजन्सी लगतच्या मोकळ्या जागेतून बेलोरा, खंडाळा, लोणदरी फाटा, जनुना फाटा आदी भागांकडे अवैध प्रवासी वाहतूक सुरू असल्याचा आरोप आहे. याच ठिकाणी गॅस सिलेंडरचे वितरणही होत असल्याने अपघाताची शक्यता वाढली आहे.

त्यामुळे पोलिस व राज्य परिवहन महामंडळाने संयुक्त मोहीम राबवून अवैध वाहतुकीवर कारवाई करावी व बेलोरा पॉईंट कायमस्वरूपी बंद करावा, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# ‘स्माईल इमोजी’वरून वाद; वाढदिवसाच्या पार्टीत चाकूहल्ला

## १३ जणांविरुद्ध गुन्हा : ढाणकीतील सहारा पार्क परिसरातील घटना; दोन युवक गंभीर जखमी, अल्पवयीनांसह आरोपींना अटक

प्रतिनिधी १० जून

**ढाणकी :** सोशल मीडियावरील एका ‘स्माईल इमोजी’वरून सुरू झालेला किरकोळ वाद ढाणकी येथे रक्तरंजित हाणामारीत परिवर्तित झाला. मित्राच्या वाढदिवसाच्या पार्टीदरम्यान झालेल्या या हल्ल्यात दोन युवक गंभीर जखमी झाले असून बिटरगाव पोलिसांनी १३ जणांविरुद्ध खुनाच्या प्रयत्नासह विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपींपैकी काही जण अल्पवयीन असल्याची माहिती पोलिसांनी दिली.



फिर्यादी हर्षद संतोष खटके (१८, रा. ढाणकी) याने दिलेल्या तक्रारीनुसार, सोमवारी दुपारी अमन पठाण याने इन्स्टाग्रामवर हाताला सलाईन लावल्याचे स्टेटस ठेवले होते. त्या स्टेटसवर हर्षदने ‘स्माईल’ इमोजी पाठविल्याने दोघांमध्ये सोशल मीडियावर वाद झाला होता.

त्याच रात्री ढाणकी येथील सहारा पार्क परिसरात मित्र गोलू गिरी याचा वाढदिवस साजरा करण्यासाठी हर्षद व त्याचे मित्र जमले होते. दरम्यान, दुपारच्या वादाचा राग मनात धरून धम्मदिप संजय काळबांडे याच्यासह काही युवक मोटारसायकलींवरून तेथे पोहोचले. दोन्ही गटांमध्ये शाब्दिक वाद सुरू झाला. परिस्थिती चिघळताच आणखी काही युवकांना घटनास्थळी बोलावण्यात आले.

> ▪ घटनेची माहिती मिळताच बिटरगावचे ठाणेदार पांडुरंग शिंदे यांनी पोलिस पथकासह घटनास्थळी धाव घेतली. वाढता तणाव लक्षात घेऊन जिल्हा पोलिस अधीक्षक कुमार चैतन्य यांनी अतिरिक्त बंदोबस्त तैनात केला. तीन विशेष पथके तयार करून काही तासांत आरोपींना ताब्यात घेण्यात आले. प्रकरणाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक सागर अन्नमवार करीत आहेत.

तक्रारीनुसार, हर्षदने माफी मागून वाद मिटविण्याचा प्रयत्न केला. मात्र, आरोपींनी त्याकडे दुर्लक्ष केले. वाद सोडविण्यासाठी मध्ये पडलेल्या गोलू गिरी याच्यावर धम्मदिप काळबांडे याने चाकूने मानेवर वार केल्याचा आरोप आहे. गंभीर जखमी झालेला गोलू रक्ताच्या थारोळ्यात कोसळला. त्याला वाचविण्यासाठी धावलेल्या ओमकार भुसावळे याच्यावरही चाकूने वार करण्यात आला. हर्षद खटके यालाही बरगडीजवळ दुखापत झाली.

दरम्यान, पोलिसांचे वाहन घटनास्थळी पोहोचत असल्याचे दिसताच आरोपी मोटारसायकलींवरून पसार झाले. जखमींना तत्काळ प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. प्रकृती गंभीर असल्याने गोलू गिरी व ओमकार भुसावळे यांना पुढील उपचारांसाठी उमरखेड येथे हलविण्यात आले.

या प्रकरणी बिटरगाव पोलिसांनी धम्मदिप काळबांडे, सुरज काळबांडे, मोहन काळबांडे, सुनील काळबांडे, मेधन काळबांडे, सम्यक काळबांडे, अजय काळबांडे, अनिकेत काळबांडे, गोपाल रावते, अमन बुरेखान पठाण, रंजित वाढवे, पवन कांबळे आणि शेख असलम यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बीएनएस) अंतर्गत खुनाच्या प्रयत्नासह विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे.

## कोसदनी-साकूर-मुकिंदपुर मार्गावरील भेगा बुजविण्याचे काम सुरू

प्रतिनिधी १० जून

**आर्णी :** कोसदनी–साकूर–मुकिंदपुर मार्गावरील नव्याने उभारण्यात येत असलेल्या सिमेंट रस्त्यावर पडलेल्या भेगा आणि कामाच्या गुणवत्तेबाबत वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने कारवाई केली आहे.

संबंधित अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली असून रस्त्यावरील भेगा बुजविण्याचे आणि दोष दूर करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.



मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत सुमारे १४ कोटी रुपयांच्या निधीतून या मार्गाचे बांधकाम सुरू आहे. मात्र काम पूर्ण होण्यापूर्वीच अनेक ठिकाणी भेगा पडल्याने ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला होता. रस्त्याच्या दर्जाबाबत शंका उपस्थित करत नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तक्रारीही केल्या होत्या.

वृत्त माध्यमांतून हा मुद्दा समोर आल्यानंतर विभागाने त्याची गंभीर दखल घेत संबंधित कंत्राटदाराला तातडीने दुरुस्तीचे निर्देश दिले. त्यानुसार तडा गेलेल्या भागांची दुरुस्ती सुरू करण्यात आली असून आवश्यक त्या ठिकाणी पुन्हा बांधकाम करण्यात येत आहे.

रस्त्याच्या गुणवत्तेची स्वतंत्र तपासणीही करण्यात येत असल्याची माहिती विभागीय अधिकाऱ्यांनी दिली. सध्या सुरू असलेल्या दुरुस्तीच्या कामामुळे ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले असले तरी संपूर्ण रस्त्याचे काम उच्च दर्जाचे आणि दीर्घकाळ टिकणारे व्हावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.

## आरोग्य विभागात समुपदेशनाद्वारे ४,१९३ पारदर्शक बदल्या

प्रतिनिधी १० जून

**यवतमाळ :** सार्वजनिक आरोग्य विभागातील गट-क संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदली प्रक्रियेत यंदा प्रथमच समुपदेशनाधारित, पारदर्शक व तंत्रशुद्ध पद्धतीचा अवलंब करण्यात आला. राज्यातील ४,५०६ बदलीपात्र कर्मचाऱ्यांपैकी ४,१९३ कर्मचाऱ्यांच्या बदल्यांसाठी शिफारसी करण्यात आल्या.



आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर व राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रक्रिया राबविण्यात आली. सेवा ज्येष्ठता, पसंतीक्रम, दुर्गम भागातील सेवा तसेच वैद्यकीय व कौटुंबिक परिस्थितीचा विचार करून बदल्या करण्यात आल्या. संचालक आरोग्य सेवा (प्राथमिक) डॉ. विजय कंदेवाड यांच्या प्रशासकीय नियोजनातून संपूर्ण प्रक्रियेचे काटेकोर नियोजन करण्यात आले. व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे मार्गदर्शन, हरकतींचे तत्काळ निवारण, प्रक्रियेचे व्हिडिओ चित्रीकरण आणि राज्यस्तरीय निरीक्षकांच्या देखरेखीमुळे पारदर्शकता सुनिश्चित करण्यात आली. १३ ते २३ मे २०२६ या कालावधीत छत्रपती संभाजीनगर, नागपूर, अकोला, नाशिक, पुणे, कोल्हापूर, लातूर व ठाणे परिमंडळांसह विविध विशेष आरोग्य संस्थांमध्ये समुपदेशन प्रक्रिया यशस्वीपणे पार पडली. यामध्ये परिचारिका संवर्गातील १,५७५, बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (पुरुष) ८०८, कनिष्ठ लिपिक १९७, औषध निर्माण अधिकारी १६० आणि प्रयोगशाळा सहाय्यक १४९ कर्मचाऱ्यांच्या बदल्या निश्चित करण्यात आल्या. बदलीपात्र कर्मचाऱ्यांची व रिक्त पदांची यादी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली होती. कर्मचारी संघटनांसह अनेक कर्मचाऱ्यांनी या प्रक्रियेला "न्याय्य व विश्वासार्ह" अशी प्रतिक्रिया दिली आहे. यावर्षी कर्मचाऱ्यांचे सहकार्य आणि सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने बदली प्रक्रिया अधिक नियोजनबद्ध व पारदर्शकपणे पार पाडता आली, अशी माहिती संचालक आरोग्य सेवा (प्राथमिक) डॉ. विजय कंदेवाड यांनी दिली.

## उमरखेड-महागावच्या विकासासाठी पालकमंत्र्यांकडे धाव



प्रतिनिधी १० जून

**उमरखेड :** उमरखेड-महागाव विधानसभा मतदारसंघातील विविध विकासकामांना गती देण्यासाठी साहेबराव कांबळे यांनी मुंबई येथे राज्याचे मृदा व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी मतदारसंघातील रस्ते, पाणीपुरवठा, सिंचन, जलसंधारण, ग्रामीण विकास तसेच शैक्षणिक व सामाजिक सुविधांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

मतदारसंघातील प्रलंबित विकासकामे मार्गी लावण्यासाठी आणि नव्या योजनांना मंजुरी मिळवून देण्यासाठी शासन स्तरावर आवश्यक सहकार्य करण्याची विनंती कांबळे यांनी पालकमंत्र्यांकडे केली. जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी विकासकामांना प्राधान्य देण्यात यावे, अशी मागणीही त्यांनी यावेळी केली.

उमरखेड-महागाव विधानसभा क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याचे सांगत, नागरिकांच्या मूलभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू राहील, असा निर्धार साहेबराव कांबळे यांनी व्यक्त केला. जनतेचा विश्वास आणि विकासाचा ध्यास घेऊन मतदारसंघाच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रयत्न सुरू ठेवणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## १७ वर्षे रखडलेला पूल; कुरळीतील १४ शेतकऱ्यांचे आमरण उपोषण

प्रतिनिधी १० जून

**उमरखेड :** कुरळी येथील अमडापूर लघु प्रकल्पाच्या नाल्यावर मंजूर पूल व पोचरस्त्याचे काम तब्बल १७ वर्षांपासून अपूर्ण असल्याच्या निषेधार्थ १४ शेतकऱ्यांनी उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. वारंवार पाठपुरावा, निवेदने आणि आंदोलने करूनही काम पूर्ण न झाल्याने शेतकऱ्यांनी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे.




उपोषणकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, २००६ मध्ये सुरू झालेल्या या कामाबाबत प्रशासनाने अनेकवेळा आश्वासने दिली. २९ जून २०२३ रोजी झालेल्या बैठकीत मे २०२४ पूर्वी पूल पूर्ण करण्याचे लेखी आश्वासन देण्यात आले होते. मात्र, मुदत उलटूनही काम अपूर्ण असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

पूल व रस्ता नसल्याने शेतात जाणे, शेतीमालाची वाहतूक आणि कृषी कामे करण्यासाठी अडचणी निर्माण होत असून आर्थिक नुकसान सहन करावे लागत असल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले. संबंधित काम निकृष्ट दर्जाचे झाले असून काही अधिकारी व ठेकेदारांच्या संगनमताने काम पूर्ण न करताच बिले काढण्यात आल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला आहे. या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

पूल व पोचरस्त्याचे काम तातडीने पूर्ण करणे, उर्वरित जमीन संपादन प्रक्रिया मार्गी लावणे, निकृष्ट कामाची चौकशी करून दोषींवर फौजदारी कारवाई करणे तसेच नुकसानभरपाई देणे, या प्रमुख मागण्या आंदोलनकर्त्यांनी केल्या आहेत.

उपोषणात गंगाधर पाटील, रामेश्वर पाटील, अभिलाष इंगोले, वामन पाटील, देवराव वाठोरे, गौतम पाईकराव, बुद्धभगवान वाठोरे, भगवान इंगोले, साहेबराव रायघोळ, बालाजी वाठोरे, लक्ष्मीबाई नरवाडे, लक्ष्मण पाटील, नरहरी पाटील व अनुसया नरवाडे यांचा सहभाग आहे.

१७ वर्षांपासून रखडलेल्या या प्रकल्पाबाबत प्रशासन कोणती भूमिका घेते आणि शेतकऱ्यांच्या मागण्या कशा सोडवते, याकडे परिसराचे लक्ष लागले आहे.

महाराष्ट्र शासन
**तालुका दंडाधिकारी, यवतमाळ यांचे न्यायालय**
Email Id-tahsildaryavatmal@gmail.com
**दुरध्वनी क्रमांक ०७२३२-२३८१९४**
**प्रकरण क्रमांक 190 /जन्म-मृत्यु नोदणी/२०२५**
**मौजा टेंभुर्णी ता. यवतमाळ**

**जाहीर सुचना**

ज्याअर्थी, निबंधक तथा ग्राम पंचायत अधिकारी, टेंभुर्णी जा. यांनी मौजा टेंभुर्णी ता. यवतमाळ येथील बादल दिलीप राठोड यांची दिनांक ०७.१०.२००८ रोजीची मौजा टेंभुर्णी ता. यवतमाळ येथे झालेली जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय, टेंभुर्णी नोंदवहीमध्ये केलेली / झालेली नसल्यामुळे व एका वर्षापेक्षा जास्त विलंब झालेला असल्यामुळे जन्म - मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १७ व महाराष्ट्र जन्म मृत्यू नोंदणी नियम २००० मधील नियम १३ (३) अन्वये आदेशास्तव प्रस्ताव या न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी, सर्वत्र नागरीकांना याव्दारे कळविण्यात येते की, बादल दिलीप राठोड, रा. टेंभुर्णी ता. यवतमाळ यांचे जन्माची नोंद जन्म रजिस्टर मध्ये घेण्याबाबत कोणासही काही आक्षेप वा हरकती असल्यास आपल्या हरकती वा आक्षेप या न्यायायलयास १५ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात दाखल कराव्यात. विहीत मुदतीत किंवा आदेशाच्या दिनांकापर्यत कोणाच्याही हरकती वा आक्षेप या कार्यालयास प्राप्त न झाल्यास, कोणासही काहीही सांगावयाचे नाही किंवा आक्षेप नाही, असे गृहीत घरुन अर्जदार यांचा जन्म नोंदीचा आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर प्राप्त होणारे आक्षेप वा हरकतीचा ग्राहय धरण्यात येणार नाही. आज दिनांक ०८.०६.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का
**स्वा./-**
**तहसिलदार, यवतमाळ**

## हॅम्पच्या ठेकेदाराला पाण्याची ॲलर्जी असल्यामुळे धुळीचे साम्राज्य

प्रतिनिधी १० जून

**उमरखेड :** सध्या उमरखेड तालुक्यात सर्वत्र अर्धवट कामाचा सपाटा चालू आहेत. सिमेंट रस्त्यावर पाणी टाकल्याशिवाय त्यामध्ये मजबूती येत नाही हे सर्वसामान्य जनतेला समजत असताना सुद्धा कडक उन्हाळ्यामध्ये सिमेंटचे बांधकाम करून रस्ते तसेच मोकाट सोडले जात आहे. कामावर पाणी टाकले जात नसून सर्व धुळ रस्त्यावर दिसत असून यावरून हॅम्पच्या ठेकेदाराला पाण्याची ॲलर्जी असून नागरीका ना धुळीमुळे नाहक त्रास होत असुन असा प्रश्न निर्माण होत असताना दिसत आहे.



गेल्या अनेक वर्षापासून उमरखेड ते हरदडा हा रस्ता अत्यंत खड्डेमय असताना याकडे कुणीही लक्ष दिले जात नाही.

विशेष म्हणजे हा रस्ता ढाणकी बाजारपेठ व बंदी बघायला जोडणार आहे. या रस्त्याचे काम हॅम्पया संस्थेला देण्यात आले असून अतिशय मंद गतीने, निकृष्ट दर्जाचे व पाणी वापर कमी असलेला रस्ता बनवण्याचे काम सध्या चालू आहे. रस्ता पावसाळ्यापूर्वी पूर्ण करावा म्हणून या मार्गावरील सर्व गावातील नागरिकांनी आंदोलन केले. या आंदोलनाची दखल घेऊन 30 जून पूर्वी रस्ता पूर्ण करतो असे आश्वासन संबंधित ठेकेदाराने दिले. आश्वासन दिल्यानंतर गेल्या अनेक दिवसापासून एकतर्फी रस्त्यावर गिट्टी टाकण्यात आली त्यावर पुढची कोणतेही काम झाले नाही.

> ▪ हॉम्पच्या रस्त्याचे काम पूर्ण व्हावे म्हणून आम्ही आंदोलन केले 30 जून ही आम्हाला तारीख दिलेली आहे. परंतु रस्त्याचे काम निकृष्ट असून जिथे काम होत नाही तेथील वृक्षाची तोड मोठ्या प्रमाणावर होत आहे. राजकीय आनास्था व परसेंटेजमुळे हे काम निकृष्ट होत आहे.
> - सादिक शेख, मनसे तालुकाध्यक्ष उमरखेड

एकतर्फी रस्त्यावरील गिट्टी कच्चा रस्त्यावर आली त्यामुळे दुचाकी व चार चाकी वाहनांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.. आता कुठे कामाची सुरुवात झाली आहे. परंतु दिलेले आश्वासन पाळायचे म्हणून रस्ता थातूरमातूर करण्याचा प्रयत्न संबंधित संस्थे कडून चालू आहे.

हा रस्ता पावसाळ्यापूर्वी पूर्ण नाही झाल्यास या रस्त्यावर अनेक अपघात होण्याची शक्यता आहे. या रस्त्याची लांबी व नियोजन पाहता येणाऱ्या पावसाळ्यामध्ये पुसद पासून हरदड्या पर्यंत सर्वच प्रवाशांना तारेवरची कसरत करावी लागण्याची शक्यता आहे. या कामासंदर्भात चौकशी करण्यासाठी भ्रमणध्वनी केला असता तो बंद असतो किंवा जर उचलला तर वरिष्ठांचे नंबर दिले जात नाहीत.

**जाहीरनामा**

कमलाबाई दतू आडे यांचा मृत्यू दिनांक 5/6/2007 रोजी झाला. तसेच मारुती शित्रू शेडमाके यांचा मृत्यू दिनांक ३/१०/१९९० रोजी झाला. इस्ती शीत्रू शेडमाके यांचा मृत्यू दिनांक 10 /7/1989 रोजी झाला. गजानन चंपत पेंदोर यांचा मृत्यू दिनांक 10/9/2001 रोजी झाला. गिरीजाबाई मारुती पेंदोर यांचा मृत्यू दिनांक 23/7/2009 रोजी झाला वरील सर्व मृतक रा. बिलायता ता. तालुका घाटंजी, जिल्हा यवतमाळ येथील आहे.

ग्रामपंचायत बिलायता ता. घाटंजी जि. यवतमाळ येथे जन्म व मृत्यूची नोंदणी रजिस्टर मध्ये नोंद नसल्यामुळे जन्ममृत्यु नोंदणी अधिनियम 1969 व सुधारणा अधिनियम 2023 चे कलम 13 (3) अंतर्गत या सर्व मृतकाची नोंद ग्रामपंचायत बिलायता येथे जन्म व मृत्यू रजिस्टर मध्ये नोंदवून मृत्यूचा दाखला देण्याचा आदेश मिळण्याबाबत अर्जदार राजू दत्तू जी आडे, संतोष शंकर शेडमाके, चंपत गजानन पेंदोर व परमेश्वर मारुती पेंदोर यांनी तहसीलदार घाटंजी यांना अर्ज सादर केले होते.

त्या अनुषंगाने सदर प्रकरणी कोणाचा आक्षेप किंवा हरकती असल्यास त्यांनी 15 दिवसाच्या आत निबंधक, जन्ममृत्यू नोंदणी ग्रामपंचायत कार्यालय बिलायता तसेच ग्राम महसूल अधिकारी बिलायता यांच्याकडे लेखी स्वरूपात पुराव्यासह आक्षेप सादर करावे. नंतर आलेल्या आक्षेपाचा / हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

शिक्का
**स्वा./-**
**मा. विजय साळवे**
**तहसीलदार, घाटंजी**

सिटी न्यूज अमरावती

बुधवार, दि. १० जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# निंभोरा येथील शासकीय वसतिगृह प्रवेश प्रक्रिया सुरू

**अमरावती:** जिल्ह्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विजाभज, इतर मागासवर्ग आणि आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी सामाजिक न्याय विभागाच्या निंभोरा येथे कार्यरत शासकीय वसतिगृहांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी प्रवेश प्रक्रिया अधिकृतपणे सुरू करण्यात आली आहे. यात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह (युनिट क्र. १, २, ३), निंभोरा, अमरावती, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर (जुने नाव गुणवंत) शासकीय वसतिगृह, निंभोरा, अमरावती, संत गाडगे महाराज मुलांचे शासकीय वसतिगृह, निंभोरा, अमरावती या वसतिगृहांमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना शासनातर्फे सर्व प्रकारच्या सोयी-सुविधा मोफत पुरविल्या जाणार आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी सर्वप्रथम hmas.mahait.org या अधिकृत पोर्टलवर जाऊन ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक आहे.

# महिला प्राध्यापकांच्या नेतृत्व विकासासाठी ‘नारीदृष्टी’ उपक्रम- उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील

## ◆ महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्थाकडून आयोजित ‘नारीदृष्टी’ उपक्रम माहितीपत्रकांचे हस्ते अनावरण

प्रतिनिधी १० जून

**अमरावती :** राज्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. उच्च शिक्षण क्षेत्रात महिला नेतृत्व अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था (MSFDA), पुणे यांच्या वतीने ‘नारीदृष्टी : Nurturing Visionaryed Women Lerders for Transformation in Acamia’ हा विशेष नेतृत्व विकास कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमाच्या माहितीपत्रकाचे मंत्रालयात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते मंत्रालयात अनावरण करण्यात आले.



यावेळी उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अप्पर मुख्य सचिव बी.वेणुगोपाल रेड्डी, महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्थेचे कार्यकारी संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे उपसचिव अशोक मांडे, सहसंचालक अर्चना बोराडे उपस्थित होते.

दिनांक १५ ते १९ जून २०२६ दरम्यान महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था (MSFDA), पुणे येथे आयोजित करण्यात येणाऱ्या या निवासी कार्यक्रमात देशातील नामवंत कुलगुरू, शिक्षणतज्ज्ञ, धोरणकर्ते आणि विविध क्षेत्रांतील प्रेरणादायी महिला नेतृत्वकर्त्यांचे मार्गदर्शन सहभागींस लाभणार आहे.

कार्यक्रमाच्या मार्गदर्शकांमध्ये डॉ. भूषण पटवर्धन (कुलपती, डेक्कन कॉलेज अभिमत विद्यापीठ, पुणे; माजी उपाध्यक्ष, विद्यापीठ अनुदान आयोग), प्रा. शशिकला वंजारी (कुलगुरू, राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था – NIEPA, नवी दिल्ली), कर्नल प्रा. हेमलता के. बगला (कुलगुरू, hSNC विद्यापीठ, मुंबई), डॉ. मनाली क्षीरसागर (कुलगुरू, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ), डॉ. विद्या येरवडेकर (प्र-कुलपती, सिम्बायोसिस इंटरनॅशनल विद्यापीठ), डॉ. ज्योती जाधव (प्र-कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर), वर्षा ठाकूर-घुगे (IAS) तसेच तेजस्वी सातपुते (IPS) यांचा समावेश आहे.

मंत्री चंद्रकांतदादा म्हणाले म्हणाले,उच्च शिक्षण संस्थांमध्ये महिलांची भूमिका अधिक व्यापक आणि प्रभावी होत आहे. अध्यापन, संशोधन आणि शैक्षणिक व्यवस्थापनामध्ये महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर वाढत असला तरी नेतृत्वाच्या उच्च स्तरांवर त्यांचे प्रतिनिधित्वअधिक वाढावे यासाठीमहिलांच्या शैक्षणिक, प्रशासकीय आणि संस्थात्मक नेतृत्वासाठी आवश्यक दृष्टी, कौशल्ये आणि आत्मविश्वास वाढविण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

या Project Baesd Lerrning या कार्यक्रमाद्वारे विद्यार्थीकेंद्रित आणि अनुभवाधारित अध्यापन पद्धतींना चालना दिली जाणार आहे. Ter&ching Smart: Soft Skis, Life Skiòs and Aled या कार्यक्रमातून कृत्रिम बुद्धिमत्ता आणि नव्या तंत्रज्ञानाचा अध्यापन प्रक्रियेत प्रभावी वापर तसेच २१व्या शतकातील आवश्यक कौशल्यांचा विकास यावर भर दिला जाणार आहे. तर CO-PO Integration and Micro-Planning for Outcome-Baesd Accreditation हा कार्यक्रम Outcome-Baesd Education तसेच NAAC आणि NBA मानांकन प्रक्रियेसाठी आवश्यक असलेल्या शैक्षणिक नियोजन व अंमलबजावणीसंदर्भात मार्गदर्शन करणार आहे.राज्यातील उच्च शिक्षण क्षेत्रातील गुणवत्ता वृद्धी, अध्यापनातील नावीन्य, शैक्षणिक नेतृत्व आणि संस्थात्मक उत्कृष्टता यांना चालना देण्यासाठी MSFDA मार्फत आयोजित करण्यात येणारे हे कार्यक्रम महत्त्वपूर्ण ठरणार असून इच्छुक प्राध्यापकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी : www.msfda.ac.in

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा वर्धापन दिन समर्पण, संघर्ष आणि संकल्प भावनेतून साजरा

## विविध कार्यक्रमातून केले मार्गदर्शन; मान्यवरांची उपस्थिती

प्रतिनिधी १० जून

**अमरावती :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा २७ वा वर्धापन दिन बुधवार, १० जून २०२६ रोजी आमदार सुलभाताई खोडके यांच्या रेल्वे स्टेशन चौक स्थित जनसंपर्क कार्यालय येथे सकाळी ९.३० वाजता मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी पक्षाच्या ध्वजाचे ध्वजारोहण व मानवंदना देऊन पक्षाचा गौरव सोहळा साजरा करण्यात आला.



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जडणघडणीत आणि देशभरात पक्षाचा विस्तार करण्यासाठी दिवंगत लोकनेता अजितदादा पवार यांनी दिलेल्या अतुलनीय योगदानामुळे हा २७ वा वर्धापन दिन पूर्णपणे अजितदादांना समर्पित करण्यात येत आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री माननीय सुनेत्रावहिनी अजित पवार यांच्या नेतृत्वात बुधवार दिनांक १० जून २०२६ रोजी साजरा होणारा हा २७ वा वर्धापन दिन अत्यंत भावनिक आणि समर्पित वातावरणात पार पडला. अजितदादांच्या स्वप्नातील शिव-शाहू-फुले-आंबेडकर यांच्या प्रेरणादायी विचारांनी प्रेरित होऊन, यशवंतराव चव्हाण यांनी रचलेल्या सुसंस्कृत राजकीय महाराष्ट्राचा वारसा जपण्याचा संकल्प करण्याचा हा सोहळा आहे. समर्पण, संघर्ष आणि संकल्प भावनेतून साजरा होणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या २७ व्या वर्धापन दिन कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या सर्व सेलचे प्रमुख, आजी -माजी पदाधिकारी कार्यकर्ते व सहकाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी प्रदेश महासचिव ( संघटन ) आ.संजय खोडके यांनी दिली आहे.

# मृग नक्षत्राच्या पहिल्याच पावसात झालेल्या नुकसानीची पाहणी करण्याकरीता आ. रवि राणा रस्त्यावर

प्रतिनिधी १० जून

**अमरावती :** संबधीत विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना घेतले धारेवर किरण नगर, मोती नगर, स्वस्तीक नगर, नवाथे, महाविर नगर, गोपाल नगर, निंभोरा, सुशिल नगर, शिवशक्ती नगर, साई नगर, बडनेरा जुनिवस्ती, बडनेरा नवीवस्ती व अमरावती शहरातील दौरा करुन कामे वेळेत न झाल्यामुळे नुकसान झाले असून संबधीत अधिकारी यांना फटकावुन लवकरात लवकर कामे करण्याचे दिले आ.रवि राणा यांनी निर्देश दिले.

नागरिकांची सुरक्षा आणि सुविधा ही आमची सर्वोच्च प्राथमिकता आहे. त्यामुळे निष्काळजीपणा करणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याची गय केली जाणार नाहीअसे आ.रवि राणा म्हणाले.



मृग नक्षत्राच्या पहिल्याच वादळी आणि मुसळधार पावसाने अमरावती व बडनेरा शहराला अक्षरशः झोडपून काढले. मान्सूनच्या सुरुवातीलाच शहरातील प्रशासनाच्या पूर्वतयारीचा फज्जा उडाल्याचे चित्र पाहायला मिळाले. शहरातील अनेक प्रमुख रस्ते आणि अंतर्गत भागांमध्ये मोठमोठी झाडे व त्यांच्या फांद्या कोसळल्याने वाहतूक विस्कळीत झाली, तर महावितरणच्या वीज वाहिन्यांवर झाडे पडल्याने अनेक भागांतील विद्युत पुरवठा पूर्णपणे खंडित झाला.

शहरातील निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीची माहिती मिळताच आमदार रवी राणा यांनी तात्काळ रस्त्यावर उतरून विविध भागांची पाहणी केली. किरण नगर, मोती नगर, स्वस्तिक नगर, नवाथे नगर, महावीर नगर, गोपाल नगर, साई नगर, बडनेरा जुनी वस्ती, बडनेरा नवी वस्ती तसेच अमरावती शहरातील अनेक भागांचा दौरा करून त्यांनी परिस्थितीचा आढावा घेतला.

पहिल्याच पावसात शहरातील अनेक रस्ते झाडांनी अडवल्याचे, नाले तुंबल्याचे आणि वीज व्यवस्था कोलमडल्याचे चित्र पाहून आमदार रवी राणा यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. त्यांनी महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागासह संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना घटनास्थळीच पाचारण करून चांगलेच धारेवर धरले. पावसाळ्यापूर्वी नालेसफाई, झाडांची छाटणी आणि आपत्ती व्यवस्थापनाची आवश्यक कामे वेळेत का झाली नाहीत? पहिल्याच पावसात शहराची अशी अवस्था होत असेल तर पुढील काळात नागरिकांचे काय होणार?ठ असा संतप्त सवाल करत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांची कानउघाडणी केली.

महापालिकेच्या निष्काळजीपणामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत असल्याचे नमूद करत आमदार रवी राणा यांनी सर्व यंत्रणांना तातडीने कामाला लागण्याचे आदेश दिले. त्यांनी रस्त्यांवर पडलेली झाडे त्वरित हटवणे, वाहतूक सुरळीत करणे आणि वीज पुरवठा पूर्ववत करण्यासाठी युद्धपातळीवर उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. दरम्यान, आमदार रवी राणा यांच्या आक्रमक भूमिकेनंतर महापालिकेची स्वच्छता पथके, आपत्ती व्यवस्थापन विभाग आणि महावितरणचे कर्मचारी तातडीने कामाला लागले. क्रेनच्या साहाय्याने रस्त्यावरील झाडे हटविण्याचे काम सुरू करण्यात आले असून काही मुख्य मार्गांवरील वाहतूक हळूहळू सुरळीत होत आहे. तसेच खंडित झालेला विद्युत पुरवठा टप्प्याटप्प्याने पूर्ववत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. शहरातील नागरिकांनीही आमदार रवी राणा यांनी प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून परिस्थितीची पाहणी केल्याबद्दल समाधान व्यक्त केले असून प्रशासनाने भविष्यात अशा परिस्थितीची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी ठोस नियोजन करण्याची मागणी केली आहे. यावेळी उपमहापौर सचिन भेंडे यांच्यासह देवा शेंडे व परीसरातील असंख्य नागरीक उपस्थित होते.

# खंडित झालेल्या ५ उपकेंद्राचा वीज पुरवठा युध्द पातळीवर पुर्ववत

## ◆ उपकेंद्रांपासून ग्राहकांच्या घरांपर्यंत पोहोचणाऱ्या वाहिन्यांच्या कामाला गती

प्रतिनिधी १० जून

**अमरावती:** संध्याकाळी ५ वाजे दरम्यान झालेल्या प्रचंड वादळासह पावसाचा परिणाम होऊन अमरावती शहरातील ५ उपकेंद्रे बाधित झाली होती. परंतू वादळ थांबताच महावितरण कर्मचाऱ्यांनी कामाला युध्दस्तरावर गती देवून प्रथम बाधित झालेल्या उपकेंद्राचा वीज पुरवठा काही तासातच पुर्ववत केला आहे. परंतू अद्याप उपकेंद्रापासून ग्राहकांना होणारा वीज पुरवठ्याचे काम गतीने सुरू असून वीज ग्राहकांनी सहकार्य करण्याचे आवाहन मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी केले आहे. पावसासह वादळाचा



प्रचंड वेगामुळे तांत्रिक बिघाड निर्माण होऊन ३३ केव्ही वडाळी आणि ३३ केव्ही विद्युत भवन उपकेंद्राचा वीज पुरवठा २२० केव्ही कोंडेश्वर या अतीउच्चदाब उपकेंद्रापासून संध्याकाळी ५ : ८ वाजता बंद पडला. परंतू महावितरणच्या तत्परतेने या दोन्ही उपकेंद्राचा वीज पुरवठा काही मिनिटातच म्हणजे ५:३० वाजता पुर्ववत करण्यात आला. झाड पडून बंद पडलेले कॉंग्रेस नगर उपकेंद्रही ५:३२ ला सुरू करण्यात आले. तसेच २२० केव्ही लालखडी उपकेंद्रातून वीज पुरवठा होणारी ३३ केव्ही पॉवर हाऊस आणि ३३ केव्ही हनुमान नगर उपकेंद्राचा वीज पुरवठा अनुक्रमे २२० केव्ही राहटगाव आणि ३३ केव्ही अकोली उपकेंद्रातून बॅकफिडींगच्या माध्यमातून पुर्ववत करण्यात आला आहे.

वीज दुरूस्तीच्या कार्याला युध्दस्तरावर गती देण्यात आली असून उपकेंद्रानंतर वीज ग्राहकांना वीज पुरवठा करण्यासाठी असणारे ९८ पैकी ९६ फिडरचा वीज पुरवठा पुर्ववत करण्यात महावितरणला यश आले आहे. ३३ केव्ही हनुमान नगर उपकेंद्रावरील बाकी असलेल्या दोन फिडरच्या दुरूस्तीचे काम सुरू आहे. तसेच फिडरनंतर महावितरणने रोहित्र निहाय दुरूस्ती कार्याला गती दिली आहे. टप्प्या - टप्प्याने वीज पुरवठा पुर्ववत करण्यात येत आहे. अनेक ठिकाणी झाडे वीज वाहिन्यांवर पडल्याने, ते हचवून वीज पुरवठा दुरूस्त करण्यास थोडा कालावधी लागत आहे. मुख्य अभियंता अशोक साळुंके तसेच अधीक्षक अभियंता दिपक देवहाते यांचे संपूर्ण परिस्थितीवर लक्ष असून या काळात सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

# मानसिक आरोग्य क्षेत्रात करिअरची सुवर्णसंधी

## ◆ ‘अमृत मानसमित्र’ समुपदेशक प्रशिक्षणासाठी अर्ज आमंत्रित ◆ १५ ते २२ जून दरम्यान ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

प्रतिनिधी १० जून

**अमरावती:** आजच्या वेगाने बदलणाऱ्या शैक्षणिक आणि सामाजिक वातावरणामध्ये विद्यार्थ्यांना शैक्षणिक ताणतणाव, भावनिक समस्या, वर्तनात्मक अडचणी, सोशल मीडिया व डिजिटल व्यसन आणि करिअरविषयक संभ्रम यांसारख्या अनेक गंभीर आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर शाळा आणि महाविद्यालयांमध्ये प्रशिक्षित समुपदेशकांची गरज मोठ्या प्रमाणात वाढत आहे. हीच सामाजिक गरज ओळखून महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) संस्थेने पुढाकार घेतला असून, त्यांच्या वतीने ठअमृत मानसमित्र समुपदेशक प्रशिक्षण कार्यक्रमठ राबविण्यात येत आहे. या महत्त्वाकांक्षी कार्यक्रमासाठी पहिल्या बॅचकरिता येत्या १५ जून ते २२ जून २०२६ या कालावधीत इच्छुक युवक-युवतींकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले आहेत, अशी माहिती अमृतचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे दिली आहे.

या विशेष उपक्रमासाठी महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था (श्ध्श्प्), पुणे ही महाराष्ट्र शासनाची मानसिक आरोग्य क्षेत्रातील अग्रगण्य संस्था तांत्रिक भागीदार म्हणून कार्यरत राहणार आहे. 'एमआयएमएच'कडे मानसशास्त्रज्ञ, समुपदेशक आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या प्रशिक्षणाचा दीर्घ अनुभव असून, या अनुभवाच्या आधारे प्रशिक्षणाचा अभ्यासक्रम, पद्धती, पर्यवेक्षण आणि गुणवत्ता नियंत्रणाची जबाबदारी त्यांच्यामार्फत पार पाडली जाईल. या प्रशिक्षणामध्ये विद्यार्थी समुपदेशनाची मूलतत्त्वे, बाल व किशोर मानसिक आरोग्य, संवाद कौशल्ये, तणाव व्यवस्थापन, जीवनकौशल्य शिक्षण, आत्महत्या प्रतिबंध, सायबर सुरक्षा आणि डिजिटल आरोग्य अशा विविध महत्वपूर्ण बाबींचा समावेश करण्यात आला आहे. हे प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या युवक-युवतींना स्वयंरोजगार आणि व्यावसायिक विकासाची मोठी संधी उपलब्ध होणार आहे.

हे संपूर्ण प्रशिक्षण हायब्रीड म्हणजेच ऑनलाईन आणि ऑफलाईन अशा दोन्ही स्वरूपात असेल. यामध्ये १५ दिवसांचे प्रत्यक्ष वर्ग प्रशिक्षण महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था, पुणे येथे होणार असून, एक महिन्याची निरीक्षणाधारित क्षेत्रीय नियुक्ती, ऑनलाईन तज्ज्ञ सत्रे, केस चर्चा आणि सहा महिन्यांचे मार्गदर्शन समाविष्ट आहे. पुणे येथील १५ दिवसांच्या ऑफलाईन प्रशिक्षणादरम्यान निवास आणि भोजनाची व्यवस्था विद्यार्थ्यांनी स्वतः करायची आहे, मात्र अमृतच्या लक्षित गटातील पात्र उमेदवारांचा ६ महिन्यांचा संपूर्ण शैक्षणिक खर्च अमृत संस्थेमार्फत केला जाणार असल्याने हे प्रशिक्षण पूर्णपणे मोफत असेल. प्रत्येक जिल्ह्यातील गरज आणि विद्यार्थी संख्या विचारात घेऊन एका बॅचमध्ये किमान २० ते कमाल ३० उमेदवारांना प्रवेश दिला जाईल. या प्रशिक्षणासाठी एम.ए. किंवा एम.एस्सी. (मानसशास्त्र / समुपदेशन मानसशास्त्र) आणि मास्टर ऑफ सोशल वर्क (श्एं) ही शैक्षणिक पात्रता असलेले अमृतच्या लक्षित गटातील उमेदवार अर्ज करू शकतात. अर्जासोबत डोमेसाईल, उत्पन्नाचा दाखला आणि जातीचा पुरावा जोडणे आवश्यक असून 'प्रथम येईल त्यास प्राधान्य' या तत्त्वावर प्रवेश दिला जाईल. प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्यांना ठअमृत मानसमित्र समुपदेशकठ प्रमाणपत्र प्रदान केले जाईल, ज्याच्या आधारे शाळा-महाविद्यालयांमध्ये समुपदेशक, जीवनकौशल्य व मानसिक आरोग्य जनजागृती प्रशिक्षक, विद्यार्थी कल्याण अधिकारी म्हणून कार्य करण्याची किंवा खाजगी स्वरूपात स्वयंरोजगार सुरू करण्याची संधी मिळेल. इच्छुकांनी अमृत संस्थेच्या https://mahaamrut.org.in/ या अधिकृत संकेतस्थळावर मुदतीत ऑनलाईन अर्ज करावा, तसेच अधिक माहितीसाठी अमृतच्या जिल्हा व्यवस्थापक कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन 'अमृत'व्दारे करण्यात आले आहे.

# हरिभाऊ बारब्दे सहकार महर्षी - डॉ. सतीश तराळ

प्रतिनिधी १० जून

**दर्यापूर :** शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष व कोषाध्यक्ष राहिलेले, दर्यापूर खरेदी विक्री संघाचे बारा वर्षे अध्यक्ष राहिलेले स्व. एडवोकेट हरिभाऊ उपाध्य भाऊसाहेब बारब्दे सहकार महर्षी होते. स्व. बाबासाहेब सांगळुदकर यांचे राजकीय वारसदार ,काँग्रेसचे निष्ठावंत कार्यकर्ते व दर्यापूर सहकारी सूतगिरणीचे संस्थापक होते. ते कायदेतज्ञ व बहुजनांचे आधारवड होते. निष्ठा, नैतिकता, निपुणता, निगर्विता आणि निर्व्यसनीपणा त्यांची वैशिष्ट्ये होती. त्यांनी दर्यापूरच्या सहकार क्षेत्राला महाराष्ट्रात प्रतिष्ठा मिळवून दिली अशा आशयाचे उद्गार डॉ.सतीश तराळ यांनी काढले शेतकरी सदन दर्यापूर येथे स्वर्गीय हरिभाऊ उपाध्य भाऊसाहेब भाजपचे यांच्या २६ व्या स्मृती समारंभात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.



समारंभाचे अध्यक्षस्थानी दर्यापूरच्या नगराध्यक्ष सौ मंदाकिनी सुधाकरराव भारसाखळे या होत्या. त्यांनी हरिभाऊ बारब्दे यांनी सहकार क्षेत्राला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. सहकार क्षेत्रातील त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे अशा आशयाचे विचार मांडले .

शिवराज्याभिषेक दिना प्रीत्यर्थ बोलताना डॉ. सतीश तराळ पुढे म्हणाले शिवाजी महाराज वैश्विक प्रेरणाचे प्रतीक ठरले आहेत .नैतिक चारित्र्याचा जागतिक मानदंड मानदंड ठरले आहेत .अठराव्या शतकापासून विश्वात जे उठाव बंड झाले त्याची प्रेरणा शिवाजी महाराज राहिले आहेत. त्यांचा लढा धार्मिक नसून राजकीय होता. ते मुस्लिम, हिंदू, डच, फ्रेंच, इंग्रज पोर्तुगीज यांच्याविरुद्ध लढले. ते निष्ठावंत हिंदू पण सर्व धर्म समभाव जपणारे होते. त्यांनी इंग्रजांपूर्वी आरमाराची निर्मिती केली. ते विश्वनायक, विश्वचेतना, विश्वप्रेरणा होते. शिवराज्याभिषेक मराठी अस्मितेचा मानबिंदू आहे. नुकत्याच झालेल्या लोकमाता अहिल्याबाई होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त त्यांनी अहिल्याबाई होळकर यांचे विषयी सविस्तर माहिती दिली. ते म्हणाले अहिल्याबाई महान स्त्रीरत्न होते. अहिल्याबाई ह्या स्त्री शिवाजी होत्या. हे महात्मा ज्योतिबा फुले यांचेहे दोनशेवे जयंती वर्ष असल्यामुळे त्यांनी महात्मा फुले यांच्या बद्दलची ही सविस्तर माहिती दिली. ते म्हणाले महात्मा फुले हे महाराष्ट्रातील सामाजिक वांड्मयीन व लोकशाही जनक्रांतीचे आद्य प्रवर्तक होते. महान करते सुधारक होते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांना गुरु समान दर्जा दिला आहे .महात्मा गांधी त्यांचा उल्लेख खरा महात्मा असा करतात. शिवाजी महाराज हीच महात्मा ज्योतिबा फुले यांचे जीवनकार्याची प्रेरणा होती. सार्वजनिक सत्यधर्म या विश्वधर्म या विश्वधर्म होऊ शकणाऱ्या धर्माचे ते संस्थापक होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष व सहकार नेते एडवोकेट श्रीरंग पाटील अरबट यांनी केले तर पाहुण्यांचा परिचय पतसंस्थेचे सचिव प्रा गुलाबराव कळसकर यांनी करून दिला. याप्रसंगी एडवोकेट अशोक गावंडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती श्री सुनील गावंडे, तालुका खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष गजानन जाधव यांची भाषणे झाली. कार्यक्रमाला दिनकररावजी गायगोले, राजेंद्र वडाळ पाटील चंद्रकांत टोळे, अमोल बारब्दे,किशोर गणोरकर प्रभाकर कोलखेडे राजाभाऊ गायगोले नानाभाऊ कोलखेडे इत्यादी मंडळी उपस्थित होती. कार्यक्रमाचे आयोजन नागरी सहकारी पतसंस्था व तालुका खरेदी विक्री संघ यांच्यातर्फे करण्यात आले होते आभार प्रदर्शन गजानन अरबट यांनी केले.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
बुधवार दि १० जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com



# भुरट्या चोरट्यांमुळे नागरिक तंग...
# चोरट्यांचा आतंक !

•सिटी न्युज ब्युरो@ वाशीम•

शहरात भरदिवसा घर फोड्या झाल्या आहेत. तर चॅनस्नॅक प्रकरणीही वाढत आहेत. पोलिसांचा चोरांवरील धाक कमी होत आहे शहरातील कायद्या सुव्यवस्था वाऱ्यावर असून रस्त्यावरच माऱ्यामाऱ्या होत आहेत. यापूर्वी दिलीप काष्टे यांच्या अंजली गॅरेजला आग लावल्याची घटना घडली. तर दुसरीकडे किशोर रंधवे, यांच्या घरासमोरील उभी कारही मध्यरात्री पेटून दिली. ही घटना सिसीटीव्हीत कैद झाली होती. अरूणराव सरनाईक यांच्या घरातील चोरी तुकाराम वाशीमकर यांच्या घरातील चोरी, तिरूपती सिटीतील सुनिल राऊत यांच्या घरातील चोरी करून भुरट्या चोरट्यांनी आता दिवसा व रात्री धुमाकूळ घालायला सुरूवात केली आहे. मात्र, या प्रकरणातील एकाही चोराला पकडण्यात पोलिसांनी यश आले नाही. त्यामुळे प्रकरणाचा छडा लावून आरोपीला धडा शिकविण्याची मागणी होत आहे.

### चोरांचा भरला घडा, लावा छडा...
### केव्हा होणार चोरीच्या घटनाचा उलघडा

वाशीम शहरात कायद्या सुव्यवस्था सुरळीत राहाण्यासाठी चोरीच्या घटनेचा छडा लावून आरोपींना धडा शिकविण्याची गरज आहे. त्यामुळे घडलेल्या घटनांचा उलगडा केंव्हा होणार याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. नव्यानेच रूजू झालेले जिल्हा पोलिस अधीक्षक यांनी शहरातील वाढणाऱ्या घटनेकडे लक्ष देवून कायद्या सुव्यवस्था सुरळीत करण्याची मागणी होत आहे.



शहराच्या विविध भागात चॅनस्नॅकींगचे प्रकार वाढले आहेत. विविध भागामध्ये दुचाकी चोरी, दुचाकीच्या बॅटऱ्या, पेट्रोल व विविध भागासह चारचाकी गाड्यांचेही मोठ्या प्रमाणात साहित्य चोरी जाण्याच घटनेमध्ये गेल्या काही दिवसांपासून वाढ झाली आहे. यावर कळस म्हणजे आता भुरट्या चोरट्यांनी घरासमोरील गाड्या पेटून द्यायला गाड्या चोरून नायला उभ्या गाड्याचे चाके काढायला सुरूवात केली आहे. तर दुसरीकडे गॅरेजला आग लावली आहे. काही दिवसापूर्वी अरूणराव सरनाईक यांच्या घरी व सामाजिक कार्यकर्ते तुकाराम वाशिमकर यांच्याही घरी भरदिवसा चोरी झाली होती. काही दिवसापूर्वी तिरूपती सिटीतील सुनिल राऊत यांच्या घराचे कुलूप तोडून लाखोचा ऐवज चोरला वाढत्या चोऱ्यांमुळे चौकासह विविध भागातील नागरीकांमध्ये चोरट्यांची दहशत निर्माण झाली आहे. वाशिम शहर पोलीसांनी या चोरट्यांचा त्वरीत बंदोबस्त लावून नागरिकांना दिलासा द्यावा अशी मागणी या भागातील नागरिकांमधून केल्या जात आहे.



या सर्व छोट्या मोठ्या चोऱ्यांसह या भागात सक्रीय असलेले चोरटे घरातील साहित्याची सुध्दा चोरी करत असल्याच्या घटनांमुळे येथील नागरिक भयभित झाले आहेत. या सर्व प्रकाराबाबत या भागातील नागरिकांनी शहर पोलीस ठाण्यात तक्रारी देऊनही आजपर्यंत शहर पोलीसांनी चोरट्यांना पकडण्यासाठी पुढाकार घेतला नसल्याची खंत या भागातील नागरिकांकडून व्यक्त केल्या जात आहे.

### पोलिस पेट्रोलींग वाढविण्याची गरज

शहरातील चोऱ्याचे प्रमाण वाढले असून अनेक भागात छोट्या मोठ्या चोऱ्याही होत आहेत. पोलिस पेट्रोलींगही कमी झाली आहे. त्यामुळे जिल्हा पोलिस अधीक्षकांनी पोलिस पेट्रोलींग वाढविण्याची मागणी होत आहे.

# कायद्या सुव्यवस्था वाऱ्यावर...
# हाणामाऱ्या रस्त्यावर !
## शहरात गुंडगिरीत वाढ, पोलिसांवरही हल्ला





•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•

वाशीमच्या अकोला नाका परिसरात मागील आठवड्यात एका कुटुंबावर झालेल्या प्राणघातक हल्ल्याची घटना ताजी असतानाच शहरात कायदा व सुव्यवस्थेबाबत पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण करणारी धक्कादायक घटना समोर आली आहे. एका महिला पोलीस कर्मचाऱ्याच्या मित्राकडून दुसऱ्या पोलीस कर्मचाऱ्याला साक्ष बदलण्यासाठी धक्काबुक्की करत जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे . इतकेच नव्हे तर वाद होत असतांना आरोपीला थांबविण्यासाठी गेलेल्या एका पोलीस अधिकाऱ्यालाच थार वाहनाने फरफटत नेण्यात आले आहे. ही घटना उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय वाशीम समोर घडल्याने पोलिसांचा गुन्हेगारांवर धाक राहिला नसल्याची चर्चा होत आहे. त्यामुळे जिल्हा पोलीस अधीक्षकांनी याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी होत आहे.

वाशीम शहरात १ जून रोजी प्रतिक राजेश राऊत हा युवक आपल्या आई आणि लहान मुलासह बाहेती हॉस्पिटलसमोरून जात असतांना एका गॅरेज मालकाने त्यांच्या मोटरसायकलला कट मारला. 'कट का मारला?' असे विचारले असता गॅरेज मालकाने वाद घालत शिवीगाळ केली. या झटापटीदरम्यान गॅरेजवाल्याने घरातील महिलांना बोलावून प्रतिक यांच्या आई लक्ष्मीबाई राऊत यांना मारहाण केली. ज्यामध्ये त्यांचा हात फ्रॅक्चर झाला. ?आईला रुग्णालयात दाखल केल्यानंतर प्रतिक राऊत, त्यांचा भाऊ प्रविण राऊत, अंकुश सोनटक्के आणि सुरज जोगदंड हे जिल्हा सामान्य रुग्णालयाजवळील गॅरेजवर विचारणा करण्यासाठी गेले. यावरून शाब्दिक वाद झाल्याने ते वाद अधिक वाढला आणि गॅरेजमधील५ ते ६ जणांसह त्यांच्या नातेवाईकांनी या तरुणांवर लोखंडी रॉडने प्राणघातक हल्ला केला. भांडण सोडवण्यासाठी आलेले वडील राजेश राऊत यांनाही मारहाण करण्यात आली. या जीवघेण्या हल्ल्यात प्रविण राऊत याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्याच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहे. या घटनेचे काही व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली. फरार आरोपींना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करण्याच्या मागणीसाठी विविध सामाजिक संघटनांनी एकत्र येत पोलीस अधीक्षक कार्यालयावर मोर्चा काढला. या घटनेमुळे शहरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. ही घटना ताजी असतांना आणखी एक धक्कादायक घटनेची वाढ झाली आहे.

वाशीम मध्ये कार्यरत असलेली महिला पोलीस कर्मचारी निलोफर शेख याची ६ जून रोजी एका प्रकरणात उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय वाशीम येथे चौकशी सूरु होती. दरम्यान महिला पोलीस कर्मचारी शेख याचा मित्र विराज पाटील त्या ठिकाणी आला. कर्मचारी गजानन काळे याला अडविले आणि म्हणाला चौकशीत साक्ष बदल अन्यथा तुला जीवे मारून टाकीन. यावरून पोलीस कर्मचारी काळे आणि विराज मध्ये शाब्दीक वाद झाले. अन् आरोपी विराज पाटीलने कर्मचारी काळेला थेट धक्काबुक्की केली. त्यानंतर आरोपी थार गाडीत बसून पड काढत होता . दरम्यान त्याला थांबविण्यासाठी पोलीस अधिकारी जितेंद्र आडोळे प्रयत्न करत असतांना त्यांचा हात गाडीच्या काचेत अडकला. त्यामुळे आरोपीने काही अंतर त्यांना फरफरट नेले. या प्रकरणी पोलीस हवालदार गजानन काळे यांच्या तक्रारीवरून विराज पाटील आणि महिला पोलीस अंमलदार निलोफर शेख यांच्या विरोधात वाशीम शहर पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास वाशीम शहर पोलीस करीत आहे. याशिवाय मागील काही महिन्यांपासून जिल्ह्यात मोटारसायकल चोरी, घरफोडी, चैन स्नॅचिंग व इतर गुन्ह्यांच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेवर अनेक प्रश्न निर्माण झाले असून जिल्हा पोलीस अधिक्षकांनी गुन्हेगारीवर आळा घालण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात अशी मागणी जिल्हा वासियांमधून होत आहे.

## थोडक्यात
### जिल्ह्यातील ७६८ शेतकरी गटांचा फार्मर ग्रुप लिग स्पर्धा



•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•

कृषी विभाग व आत्माच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या शेतकरी गट स्पर्धा अभियान (एफजीएल) २०२६ या अभिनव उपक्रमाला जिल्ह्यातील शेतकरी गटांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून जिल्ह्यातील एकूण ७६८ शेतकरी गटांनी स्पर्धेत सहभाग नोंदविला आहे. तालुकानिहाय सहभागी शेतकरी गटांची संख्या पुढीलप्रमाणे आहे : कारंजा – १२८, मंगरुळपीर – १११, मानोरा – १३१, मालेगाव – ११५, रिसोड – १४८ आणि वाशिम – १३५. शेतकरी गट स्पर्धा अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सहभागी शेतकरी गटांच्या प्रतिनिधींचे दि. ३, ४ व ५ जून २०२६ रोजी स्व. बाळासाहेब ठाकरे प्रशिक्षण केंद्र, वाशिम येथे जिल्हास्तरीय प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. प्रशिक्षणामध्ये अभियानाची संकल्पना, स्पर्धेचे निकष, गट व्यवस्थापन, मृदा आरोग्य व्यवस्थापन, बियाणे उगवण चाचणी, बीजप्रक्रिया, सरी-वरंबा व बीबीएफ पद्धती, शेत पुनर्भरण खड्डा, नैसर्गिक शेती, हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा अवलंब, पीक संरक्षण तसेच ऑनलाइन प्रणालीवर माहिती भरण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

सदर स्पर्धा दि. ३१ जुलै २०२६ पर्यंत चालणार असून या कालावधीत सहभागी शेतकरी गटांमार्फत विविध कृषी विकासात्मक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. शेतकरी गटांमध्ये निरोगी स्पर्धा निर्माण करून सामूहिक कृतीला चालना देणे, आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार वाढविणे, नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन करणे व शाश्वत शेती पद्धतींचा प्रसार करणे ही या स्पर्धेची प्रमुख उद्दिष्टे आहेत. तसेच शासनाच्या 'खेती बचाओ अभियान' या विशेष मोहिमेची अंमलबजावणी देखील याच शेतकरी गटांच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत मृदा आरोग्य संवर्धन, जलसंधारण, पावसाच्या पाण्याचे व्यवस्थापन, नैसर्गिक शेतीचा प्रसार, हुमणी अळी नियंत्रण, पीक संरक्षण, शेततळे व जलस्त्रोत संवर्धन तसेच हवामान बदलामुळे निर्माण होणाऱ्या आव्हानांवर मात करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांचा प्रचार व प्रसार करण्यात येणार आहे. शेतकरी गट स्पर्धा अभियान व खेती बचाओ अभियानाच्या माध्यमातून गावपातळीवरील कृषी विस्तार कार्याला अधिक बळकटी मिळणार असून शेतकऱ्यांमध्ये संघटितपणे कार्य करण्याची भावना विकसित होण्यास मदत होणार आहे. याशिवाय जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय व क्षेत्रीय स्तरावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षणाचे नियोजन व अंमलबजावणीमध्ये सक्रिय सहभाग घेतला आहे. सहभागी सर्व गटांना क्षेत्रीय स्तरावर सातत्याने मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व सहभागी शेतकरी गटांनी या स्पर्धेत सक्रिय सहभाग घेऊन उत्पादन खर्चात बचत करावी, आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करावा, भरघोस उत्पादन प्राप्त करून कृषी क्षेत्रात आदर्श निर्माण करावा, असे आवाहन कृषी विभाग व आत्मा, वाशिम यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# घरगुती गॅस सिलेंडरचा हॉटेल व चहा कॅन्टीन वर खुलेआम वापर

•सिटी न्युज ब्युरो @ कारंजा•

कारंजा शहरात व तालुक्यात घरगुती सिलेंडरचा वापर हॉटेल व चहा कॅन्टीनमध्ये सर्रासपणे सुरू असून कारंजा पुरवठा निरीक्षण अधिकारी हे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे. सध्या संपूर्ण महाराष्ट्रात घरगुती सिलेंडरचा तुटवडा असून सामान्य माणसाला सिलेंडर घेण्यासाठी जीवाचे रान करावे लागत आहे.



### पुरवठा निरीक्षण अधिकाऱ्याचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष

लांब-लांब रांगेत दिवसभर उन्हामध्ये उभे राहून तेव्हा कधी एक सिलेंडर मिळत आहे. एक सिलेंडर मिळाल्यानंतर दुसरा सिलेंडर ४५ दिवसानंतर मिळत आहे. काही सर्वसामान्य गरीब कुटुंबाकडे एकच सिलेंडर असल्यामुळे त्यांची तर खूपच फजिती होत असून त्यामुळे त्यांना स्टोवर किंवा शेगडीवर स्वयंपाक करावा लागत आहे. एवढे सर्वसामान्य लोकांचे हाल होत असताना हॉटेल मालक आपल्या हॉटेल मध्ये व चहा कॅन्टीनमध्ये खुलेआम घरगुती सिलेंडरचा वापर करत आहे. सर्व हॉटेलमध्ये व चहा कॅन्टीन वर व्यवसायिक सिलेंडर वापरावा लागतो या नियमाचा कारंजा शहरामध्ये पूर्णपणे फज्जा उडवत आहे. हॉटेल व चहा कॅन्टीन मालकांना घरगुती सिलेंडर भेटतात कुठून हा एक मोठा प्रश्न आहे. कारंजा बायपास मंगरूळ रोड, अकोला रोड व दारव्हा रोड च्या बाजूला जेवढेही हॉटेल व चहा कॅन्टीन आहेत त्यामध्ये तर खुलेआम अधिकाराच्या नाकावर टीचर घरगुती सिलेंडरचा वापर होत आहे. आणि त्यामुळे आणखीनच शहरात घरगुती सिलेंडरचा तुटवडा निर्माण होत असून सर्वसामान्य गरीब जनतेचे हाल होते आहे. या सर्व बाबीकडे कारंजा तहसील पुरवठा अधिकारी आणि तहसीलदार जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असून आजपर्यंत कोणतीही कारवाई न करता उघड्या डोळ्यांनी हा सर्व अवैध प्रकार बघत आहे. या सर्व बाबीकडे जिल्हाधिकारी यांनी लक्ष घालावे अशी जनतेमधून मागणी होत आहे.

# भ्रष्टाचाराची चतुःसूत्री,
# वृक्षलागवड कागदोपत्री !

•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•



### अधिकारी जगलेत, झाडे मात्र मेली....
### रोपवाटीकेतले वृक्ष गायब !

वनविभाग व जलसंपदा विभागामार्फत रापवाटीका योजना राबविण्यात येतात. मात्र या रोपवाटिकेतच वृक्ष नसल्यामुळे वृक्ष लागवड योजना कशी राबविणार असा प्रश्न पडला आहे. रोजगार हमी योजनेत अनेक ग्रामीण भागात वृक्ष लागवड योजनेसाठी रोपवाटीका देण्यात आल्या आहे. ह्या रोप वाटीकाही कागदोपत्री असून रोपवाटिकेतच वृक्ष नसून वृक्षलागवड योजना कशी राबविणार हा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे.

वन विभागासह विविध विभागाच्या वतीने वृक्षलागवड योजना राबविण्यात येते. जिल्ह्यात ग्रामपंचायतीसह विविध कार्यालयात वृक्षारोपण करण्यासाठी लाखो रुपयाचा निधी उपलब्ध होतो. मात्र निधी पूर्ण आपसात लाटून व कागदोपत्री वृक्षारोपण दाखवून शासनाच्या विविध प्रकारच्या कार्यालयामध्ये निधी लाटण्याचा प्रकार बहुतांश ठिकाणी घडला असुन वृक्षलागवडीतली झाडे मेलीत मात्र सबंधीत निधी खिशात घालुन अधिकारी मात्र जगलेत हेच चित्र सध्या पाहावयास मिळत आहे.

तसेच तालुक्यात वृक्षारोपण फक्त कागदावरच दाखवले गेल्याचा प्रकारही झाल्याने याप्रकरणी चौकशी गरजेची असल्याची मागणी जोर धरत आहे. शासनाच्या वतीने शेतकोटी वृक्षलागवड योजना दरवर्षी राबविण्यात येते. त्यापैकी ५० ते ६० टक्केच रोपाची लागवड केली जाते. उर्वरित लागवड कागदोपत्री दाखवून निधी हडप केल्या जातो. अनेक जिल्ह्यात पावसाळा संपल्यानंतर वृक्षलागवड योजना राबविण्यात येते. या योजनेत खासगी उद्योजक, शैक्षणिक संस्था, सहकारी आणि स्वयंमसेवी संस्थांच्या सहाय्याने वृक्ष लागवडीचा कार्यक्रम पुर्ण करणे अपेक्षीत आहे. मात्र



दरवर्षी शेकडो कोटी वृक्षलागवड होवूनही पुन्हा पुन्हा वृक्षलागवड योजना राबविली जाते. ही बाब म्हणजेच वृक्षलागवड योजना फक्त कागदोपत्रीच होत असल्याचे सिध्द होते. रोजगार हमी योजनेत अनेक ग्रामीण भागात वृक्ष लागवड योजनेसाठी रोपवाटीका देण्यात आल्या आहे. ह्या रोप वाटीकाही कागदोपत्री असून रोपवाटिकेतच वृक्ष नसून वृक्षलागवड योजना कशी राबविणार हा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे.

शुद्ध ऑक्सिजन, उन्हाळ्यात जनावरांना , माणसांना, व इतर पशुपक्ष्यांना सावली हवी आहे व ती काळाची सर्वांना गरज आहे. जर अधिकारी जबाबदारी घेत नसेल तर एकच लक्ष्य दोन कोटी वृक्ष महत्त्वाकांक्षी उपक्रमाला मुठमाती देऊन वृक्ष लागवडीत 'गोलमाल' करुन ही लागवड सुरू असल्याचा प्रकार होताना दिसत आहे.

## शालेय पोषण, विद्यार्थ्यांचे शोषण, भ्रष्टशासन...
# पांढरा तांदुळ 'काळ्या' बाजारात !

### सन २०२२ ते २३ च्या चौकशी मध्ये घेतली रिकवरी, का नाही केली फौजदारी शिक्षण विभागाची मक्तेदारी, ऑपरेटर, दिवाणजी, ठेकेदार सह हिस्सेदारी, मुख्याध्यापकांचे खोटे सह्या, शिक्के वापरले माघारी

•सिटी न्युज ब्यरो @ मंगरूळपीर•

जिल्ह्यातील शालेय पोषण आहार योजनेत झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या भ्रष्टाचाराचा मुद्दा आता थेट राज्याच्या पावसाळी अधिवेशनात गाजण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा विरोधी पक्षातील आक्रमक चेहरा असलेले आमदार विजय वडेट्टीवार यांनी या गंभीर प्रकरणावर विधानसभेत 'तारांकित प्रश्न' दाखल केल्याने शिक्षण विभाग, प्रशासन आणि संबंधित पुरवठादारांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

मागील काही महिन्यांपासून वाशिम जिल्ह्यातील शालेय पोषण आहार योजनेत मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार, निकृष्ट दर्जाचा माल पुरवठा, बनावट पावत्या, कागदोपत्री व्यवहार आणि विद्यार्थ्यांच्या हक्काच्या अन्नावर डल्ला मारल्याचे आरोप सातत्याने समोर येत आहेत. माहिती अधिकारातून मिळालेली कागदपत्रे, विविध पुरावे आणि स्थानिक पातळीवरील तक्रारींच्या आधारे या घोटाळ्याची व्याप्ती कोट्यवधी रुपयांपर्यंत पोहोचल्याचा दावा केला जात आहे. या संपूर्ण प्रकरणाची दखल घेत आमदार विजय वडेट्टीवार यांनी शासनाकडे थेट प्रश्न उपस्थित केला आहे. तारांकित प्रश्नामुळे संबंधित मंत्र्यांना सभागृहात उत्तर द्यावे लागणार असून, त्यानंतर पूरक प्रश्नांच्या माध्यमातून आणखी अनेक धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता व्यक्त होत आहे. शालेय पोषण आहार योजना ही ग्रामीण व गरीब विद्यार्थ्यांना पोषणयुक्त आहार मिळावा यासाठी शासनाने सुरू केलेली महत्त्वाची योजना आहे. मात्र वाशिम जिल्ह्यात या योजनेत झालेल्या कथित गैरव्यवहारामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी आणि भवितव्याशी खेळ करण्यात आल्याचे आरोप होत आहेत. विद्यार्थ्यांच्या ताटात पोहोचायला हवे असलेले धान्य, कडधान्य, तेल, मसाले व इतर साहित्य यामध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता याल्यानी चर्चा आहे.

### २० ते चालू शैक्षणिक सत्रातील करण्यात आलेल्या भ्रष्टाचाराचा सरळ अहवाल वरिष्ठांनी न स्वीकारता सदर अहवाल टिपण्यात का मागविला

सन २०२० ते २०२६ या शैक्षणिक सत्रादरम्यान शालेय पोषण आहार योजनेत झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्यासाठी नेमण्यात आलेल्या समितीने आपला अहवाल संबंधित विभागाकडे सादर केल्याची माहिती समोर आली आहे. मात्र हा अहवाल जशास तसा स्वीकारण्याऐवजी वरिष्ठ अधिकाऱ्याऱ्यांनी तो 'टिपणी स्वरूपात' पुन्हा सादर करण्याचे निर्देश दिल्याची चर्चा होत असल्याने आल्याने संपूर्ण प्रकरणाबाबत नवे प्रश्न उपस्थित होत आहेत.

# एल निनोच्या प्रभावामुळे यंदा कमी पावसाची शक्यता !
### खरीप हंगामासाठी योग्य नियोजन करण्याचे आवाहन

•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•

महाराष्ट्रासह देशातील शेतकरी खरीप हंगामाच्या तयारीला लागले असतानाच भारतीय हवामान विभागाने 'एल निनो'च्या प्रभावामुळे यंदा पावसाचे प्रमाण कमी राहण्याची आणि त्याचे वितरण अनियमित होण्याची शक्यता वर्तवली आहे. त्यामुळे पावसावर अवलंबून असलेल्या शेतीसमोर नव्या आव्हानांचे ढग दाटू लागले आहेत. संभाव्य दुष्काळजन्य परिस्थितीचा परिणाम शेती उत्पादनावर होऊ नये यासाठी कृषी विभागाने शेतकऱ्यांना आतापासूनच नियोजनबद्ध शेती व्यवस्थापन करण्याचे आवाहन केले आहे.

एल निनो ही प्रशांत महासागरातील तापमानवाढीशी संबंधित हवामान प्रक्रिया असून तिचा परिणाम जगभरातील पर्जन्यमानावर होत असतो. भारतात अनेकदा एल निनोच्या काळात पावसाचे प्रमाण घटल्याचे दिसून आले आहे. यंदाही अशीच परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत असल्याने कृषी विभागाने शेतकऱ्यांना सावधगिरीचा इशारा दिला आहे. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरिफ शाह यांनी सांगितले की, अनिश्चित पावसाच्या परिस्थितीत पीक निवड आणि जलव्यवस्थापन या बाबी अत्यंत महत्त्वाच्या ठरणार आहेत. जास्त पाणी लागणाऱ्या आणि दीर्घ कालावधीच्या पिकांऐवजी सोयाबीन, तूर, मूग, उडीद यांसारख्या तुलनेने कमी कालावधीत येणाऱ्या पिकांना प्राधान्य देणे फायदेशीर ठरेल.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
बुधवार, दि. १० जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## धुऱ्याच्या वादातून दोन गटांत हाणामारी; परस्परविरोधी गुन्हे

**खामगाव:** तालुक्यातील हिवरखेड येथे शेताच्या धुऱ्याच्या वादातून दोन गटांमध्ये झालेल्या हाणामारीच्या घटनेनंतर परस्परविरोधी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या प्रकरणाचा तपास हिवरखेड पोलिसांकडून सुरू आहे. पहिल्या प्रकरणात दादाराव गोविंदा पारखे (५५, रा. हिवरखेड) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सोमा पुंजाजी शिंगाडे, मंगेश सोमा शिंगाडे आणि गजानन सोमा शिंगाडे यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ११८(१), ३५१(२), ३५१(३), ३५२ व ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शेतात शेणखत फेकण्याच्या कारणावरून तसेच धुऱ्याच्या जुन्या वादातून आरोपींनी शिवीगाळ करत काठी व कुऱ्हाडीने मारहाण केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. दरम्यान, याच घटनेप्रकरणी सोमा पुंजाजी शिंगाडे (७०, रा. हिवरखेड) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दादाराव गोविंदा पारखे व गोविंदा वामन पारखे यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम २९६, ११५(२), ३५१(२) व ३५१(३) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शेताच्या धुऱ्यावर असलेल्या झाडाच्या वादातून आरोपींनी अश्लील शिवीगाळ, मारहाण केली व जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे.

# आधी पाण्याचा टिपूस द्या, मगच घरात जा!

## ♦ आबालवृद्धांसह महिला धडकल्या नगराध्यक्षांच्या निवासस्थानी, म्हाडावासी १७ दिवसांपासून पाण्याविना!

प्रतिनिधी १० जून

**मलकापूर :** शहरात सध्या विकासाच्या बाता मारणाऱ्या लोकप्रतिनिधींची आणि प्रशासनाची अब्रू वेशीवर टांगली गेली आहे. शहरातील म्हाडा कॉलनी भागात गेल्या १७ दिवसांपासून पाण्याचा एक थेंबही आलेला नाही. ही लोकशाही आहे की जनतेच्या संयमाची क्रूर थट्टा, असे म्हणत पाण्यासाठी वणवण भटकणाऱ्या जनतेच्या सहनशीलतेचा शेवटी मंगळवारी रात्री अंत झाला. आबालवृद्धांसह महिलांचा मलकापुरात एका मोठ्या जनक्षोभाचा भडका उडाला. म्हाडा कॉलनीतील शेकडो तहानलेले नागरिक, ज्यात कडेवर लहान मुले घेतलेल्या महिला, आबालवृद्ध आणि पुरुषांचा समावेश होता. ते थेट नगराध्यक्ष आतीक ज्वारीवाले यांच्या निवासस्थानावर धडकले. 'आमच्या हक्काचे पाणी आम्हाला मिळालेच पाहिजे,' अशा घोषणा देत संतप्त महिलांनी चक्क नगराध्यक्षांच्या घरासमोरच 'ठिय्या आंदोलन' सुरू केले.

रात्रीच्या अंधारात घरात एसीच्या हवेत सुखाने झोपणाऱ्या लोकप्रतिनिधींना घराबाहेर तहानलेल्या जनतेचा आक्रोश ऐकवण्यासाठी नागरिकांना रस्त्यावर उतरावे लागले, यापेक्षा मोठे दुर्दैव ते काय? १७ दिवस पाणी का नाही? मलकापूर नगरपरिषदेचा कारभार नक्की रामभरोसे चालला आहे की येथील अधिकारी कुंभकर्णी झोपेत आहेत? कर गोळा करताना तत्परता, मग सुविधेच्या वेळी पळपुटेपणा का? जनतेकडून पाण्याचे टॅक्स वसूल करायला पालिका पुढे असते, मग १७ दिवस पाणी पुरवठा बंद असताना प्रशासन काय ढाराढूर झोपले होते का? निवडणुकीपुरतेच पाय धरणार का? मतांचा जोगवा मागताना गल्लोगल्ली फिरणारे नगराध्यक्ष आज म्हाडा कॉलनीतील माता-भगिनी पाण्यासाठी रस्त्यावर उतरल्या असताना कुठल्या बिळात लपून बसले आहेत? नगराध्यक्ष महोदय, तोडगा कधी निघणार... की फक्त हम वादे नहीं इरादे लेकर आये है म्हणत राहणार, असे एका पाठोपाठ प्रश्न यावेळी महिलांनी उपस्थित केले. या उग्र आंदोलनाने मलकापूर नगरपालिकेच्या नियोजनशून्य कारभाराचे धिंडवडे काढले आहेत. आंदोलक महिलांचा पारा एवढा चढला होता की, 'जोपर्यंत पाण्याचा प्रश्न सुटत नाही, तोपर्यंत इथून हलणार नाही' अशी भूमिका त्यांनी घेतली होती.

### 'तो' व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल!

नगराध्यक्ष हे कार्यालयात हजर राहत नसून नागरिकांनी पाहण्यासाठी वेळोवेळी कार्यालयाचे दरवाजे ठोकले काल नगराध्यक्ष घरी असल्याची माहिती मिळाल्याने संतप्त म्हाडावासीयांनी नगराध्यक्षांचे घर गाठले मात्र यावेळेस जनतेचे सांत्वन न करता तक्रारी घेऊन ऑफिसमध्ये या, घरी येऊ नका, असे म्हणून त्यांनी मतदारांना दमदाटी केल्याची व्हिडिओ क्लिप सोशल मीडिया द्वारे व्हायरल होत आहे जनतेने मत दिले तर तुम्हाला पाणी द्यावेच लागेल की प्रत्येक घागरीसाठी नगराध्याच्या दारात असेच कटोरे घेऊन उभे राहावे लागणार? जनतेचा हा संतप्त सवाल आहे, याचे उत्तर प्रशासनाला द्यावेच लागेल!



# खामगाव-लाखनवाडा पूर्ववत सुरू करण्याची मागणी

## ♦ लाखनवाडा ग्रामस्थांचे परिवहन मंत्र्यांना निवेदन

प्रतिनिधी १० जून

**खामगाव:** खामगाव आगाराची खामगाव-बाळापूर-लाखनवाडा-उदयनगर ही एसटी बससेवा पूर्ववत सुरू करावी, अशी मागणी लाखनवाडा येथील ग्रामस्थांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे रविवारी निवेदनाद्वारे केली आहे. यावर संबंधित बससेवा तातडीने सुरू करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन मंत्र्यांनी दिल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली.

गेल्या ३० ते ४० वर्षापासून सुरू असलेली आणि परिसरातील प्रवाशांसाठी महत्त्वाची ठरलेली खामगाव-बाळापूर-लाखनवाडा-उदयनगर ही बससेवा खामगाव आगाराने काही काळापूर्वी अचानक बंद केली. त्यामुळे विद्यार्थ्यांसह नोकरदार, शेतकरी आणि सर्वसामान्य प्रवाशांची मोठी गैरसोय होत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. दरम्यान, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक हे ७ जून रोजी बुलढाणा जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले असता लाखनवाडा येथील शिष्टमंडळाने मेहकर येथील विश्रामगृहात त्यांची भेट घेतली. यावेळी शिवाजी पाटील, संताराम तायडे, मोहम्मद इब्राहिम, विलास पांढरे, प्रल्हाद हटकर, गजानन पांढरे आदींनी निवेदन सादर करून बससेवा पूर्ववत सुरू करण्याची मागणी केली.

### संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध तक्रारीचा इशारा

यावेळी मंत्र्यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून बससेवा सुरू करण्याबाबत सकारात्मक कार्यवाहीचे आश्वासन दिल्याचे शिष्टमंडळाने सांगितले; मात्र आतापर्यंत प्रत्यक्षात बससेवा सुरू झाली नसल्याचे चित्र आहे.

तथापि, आश्वासनानंतरही सेवा सुरू न झाल्यास मुंबई येथे जाऊन परिवहन मंत्र्यांची पुन्हा भेट घेऊन संबंधित अधिकाऱ्यांविरोधात तक्रार करण्यात येईल, असा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

# वीजखांब कोसळले; लोंबकळणाऱ्या तारांमुळे भीती!

## ♦ पातुर्डा शिवारातील प्रकारः महावितरणविरोधात संताप

प्रतिनिधी १० जून

**संग्रामपूर:** गेल्या आठवड्यात झालेल्या वादळी वाऱ्यामुळे परिसरातील अनेक शेतांमधील सिमेंटचे वीजखांब उन्मळून पडले असून, उच्चदाब वीजवाहिन्या धोकादायकरीत्या लोंबकळत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पेरणीच्या तोंडावर ही परिस्थिती निर्माण झाल्याने मशागतीची कामेही प्रभावित झाली आहेत. याकडे महावितरणचे दुर्लक्ष होत असल्याने शेतकऱ्यांमधून रोष व्यक्त होत आहे.

शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, काही ठिकाणी ११ केव्ही वीजवाहिन्या जमिनीच्या अगदी जवळ आल्या आहेत. त्यामुळे ट्रॅक्टरद्वारे मशागत करणे धोकादायक बनले असून, शेतमजूरही काम करण्यास धजावत नाहीत. मान्सूनच्या तोंडावर शेतीची कामे रखडल्याने शेतकरी चिंतित आहेत. या संदर्भात महावितरणकडे वारंवार तक्रारी करण्यात आल्याचा दावा शेतकऱ्यांनी केला; मात्र १५ दिवस उलटूनही दुरुस्तीचे काम सुरू झाले नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. पडलेले खांब उभे करून वीजवाहिन्यांची दुरुस्ती करावी, अशी मागणी होत आहे. कार्यवाही न झाल्यास महावितरण उपकेंद्रासमोर ठिय्या आंदोलनाचा इशारा शेतकऱ्यांनी दिला.

### महावितरणकडून तातडीच्या कारवाईची अपेक्षा

घटनेनंतर महावितरणकडे तक्रारी करूनही दुरुस्तीचे काम सुरू न झाल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. पडलेले खांब उभे करणे, धोकादायक वीजवाहिन्या सरक्षित करणे आणि झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून भरपाई देणे आवश्यक असल्याची मागणी होत आहे. प्रशासनाने तातडीने दखल न घेतल्यास आंदोलन छेदण्याचा निर्धार शेतक-यांनी केला.

# मोफत सोयाबीन बियाण्यांसाठी माती परीक्षण बंधनकारक!

## ♦ खामगाव तालुक्यातील ३९६ शेतकऱ्यांची निवड

प्रतिनिधी १० जून

**खामगाव:** कडधान्य आत्मनिर्भरता अभियान व राष्ट्रीय खाद्यतेल अभियानांतर्गत खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना प्रमाणित सोयाबीन बियाणे मोफत वितरित करण्यात येत आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाइन नोंदणी केलेल्या पात्र शेतकऱ्यांमधून निवड प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. खामगाव तालुक्यातील ३९६ शेतकऱ्यांची मोफत सोयाबीन बियाणे वितरणासाठी निवड करण्यात आली आहे.

कृषी विभागाच्या माहितीनुसार, निवड झालेल्या शेतकऱ्यांना योजनेंतर्गत प्रमाणित दर्जाचे सोयाबीन बियाणे उपलब्ध करून दिले जाणार आहे; मात्रलाभघेण्यासाठी माती परीक्षणाचा नमुना सादर करणे बंधनकारक उपलब्ध करून दिले जाणार आहे; मात्र करण्यात आले आहे. त्यामुळे संबंधित शेतकऱ्यांनी मोफत बियाणे स्वीकारताना आपल्या शेतातील मातीचा नमुना सोबत आणावा तसेच मातीचा नमुना आणि आवश्यक अर्ज संबंधित कृषी केंद्राकडे जमा करावा, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

मोफत बियाणे वितरण सुरू!

खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना दर्जेदार सोयाबीन बियाणे उपलब्ध करून देण्यासाठी कृषी विभागामार्फत मोफत बियाणे वितरण सुरू करण्यात आले आहे.

### शेतकऱ्यांनी मातीचा नमुना कसा घ्यावा ?

माती परीक्षणासाठी नमुना घेताना काही बाबींची काळजी घेणे आवश्यक आहे. शेतातील एकाच प्रकारच्या जमिनीतून ८ ते १० ठिकाणांहून माती गोळा करावी. पिकाखालील शेतात साधारण १५ ते २० सेंटीमीटर खोलीपर्यंत माती काढावी. गोळा केलेली माती स्वच्छ प्लास्टिक पत्र्यावर एकत्र करून चांगली मिसळावी. त्यानंतर त्यातील सुमारे अर्धा किलो माती नमुन्यासाठी ठेवावी. नमुन्यावर शेतकऱ्याचे नाव, गाव, गट क्रमांक व पिकाची माहिती नमूद करून तो जमा करावा.

### शेतकऱ्यांना होणार लाभ!

या योजनेअंतर्गत १०० टक्के अनुदानावर खरीप हंगामासाठी बियाणे उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यामुळे शेतकऱ्यांचा बियाण्यांसाठी होणारा खर्च कमी करण्यास महत्त्वाचा हातभार लागणार आहे.

### माती परीक्षणामुळे उत्पादनवाढीस मदत, पीक नियोजनही सुरळीत !

माती परीक्षणाद्वारे जमिनीतील उपलब्ध अन्नद्रव्यांचे प्रमाण, जमिनीचा पोत, सामू (पीएच) आणि पीक उत्पादनासाठी आवश्यक असलेल्या विविध घटकांची अचूक माहिती मिळते. या माहितीच्या आधारे शेतकरी योग्य प्रमाणात खतांचा वापर करू शकतात. त्यामुळे खतांवरील अनावश्यक खर्च टाळून उत्पादन खर्चात बचत होते. तसेच पीक नियोजन अधिक शास्त्रीय पद्धतीने करता येते. जमिनीच्या गरजेनुसार व्यवस्थापन केल्यास पिकांची वाढ चांगली होऊन उत्पादनात वाढ होण्यास मदत होते.

# खामगावात साडेतीन लाखांचे लाकूड व जळतन जप्त



प्रतिनिधी १० जून

**खामगाव :** वन विभागाच्या बुलढाणा भरारी पथकाने खामगाव शहरात मोठी कारवाई करत बेकायदेशीररित्या साठवून ठेवलेले लाकूड व जळतन जप्त केले. या कारवाईदरम्यान बर्डे प्लॉट व सजनपुरी भागात एकूण नऊ ठिकाणी छापे टाकण्यात आले असून ३ लाख ७९ हजार ६२९ रुपये किमतीचे लाकूड व जळतन जप्त करण्यात आले आहे. भरारी पथक प्रमुख यु. आर. राऊत यांनी ही माहिती दिली.

वन विभागाला बेकायदेशीर लाकूड साठवणुकीबाबत माहिती मिळाल्यानंतर विशेष पथकाने खामगावातील बर्डे प्लॉट व सजनपुरी परिसरात एकाच वेळी छापेमारी केली. या कारवाईत विविध प्रकारचे लाकूड व जळतन मोठ्या प्रमाणात आढळून आले. संबंधितांकडे आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करण्यात आली असून नियमांचे उल्लंघन झाल्याचे प्राथमिक तपासात निदर्शनास आले आहे. वन विभागाने जप्त केलेला माल ताब्यात घेतला असून मोहम्मद साजिद शेख मुलंग, इकबाल हुसेन चौधरी, व मोहम्मद गफार फल्लीवाले यांचे विरुद्ध वन कायद्यान्वये गुन्हा दाखल केला असून पुढील चौकशी सुरू आहे.

# गोरक्षण संस्थानच्या गेटसमोर जागा ठेवा!

## ♦ प्रहार संघटनेचे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन



प्रतिनिधी १० जून

**मलकापूर :** बुलढाणा रोडवर सुरू असलेल्या रस्ता दुभाजकाच्या कामात गौरक्षण संस्थानच्या गेट समोर कट (येण्या-जाण्याची जागा) ठेवण्यात यावा, अशी मागणी प्रहार संघटनेच्या वतीने जिल्हा उपप्रमुख अजय टप यांच्या नेतृत्वात ८ जून रोजी न.प. मुख्याधिकारी मलकापूर यांच्याकडे एका निवेदनाद्वारे करण्यात आली.

दिलेल्या निवेदनात नमूद आहे की, शहरातील बुलढाणा रोडवर रस्ता दुभाजक निर्मितीचे काम सुरू आहे. याच दरम्यान रस्त्याच्या एका बाजूला गौरक्षण संस्थान असून याठिकाणी आजरोजी जवळपास ३०० पेक्षा अधिक गौ माता व जनावरे आहेत. गौरक्षणमधील गौ माता व जनावरांना दररोज चारण्यासाठी शहराच्या बाहेर नेण्यात येते. त्यामुळे मोठ्या संख्येने असलेल्या गौ माता व जनावरांना ने-आण करतेवेळी रस्त्याच्या या बाजूने दुसऱ्या बाजूला जाण्याकरीता या रस्ता दुभाजकाला गौरक्षणच्या समोर कट असणे आवश्यक आहे. जेणे करून गौमाता व जनावरांना रोडच्या पलीकडे जाण्यास सोयीस्कर होईल. नाहीतर गौमाता व जनावरांना रस्त्याच्या त्या बाजूने नेण्यासाठी फेऱ्याचा मार्ग अवलंबा लागेल व त्यामुळे वाहतुकीचाही प्रश्न निर्माण होवू शकतो. तसेच गौरक्षणमध्ये असलेल्या गौमाता व जनावरांसाठी नेहमी कुट्टी व इतर खाद्य पदार्थांची वाहने गौरक्षणमध्ये नियमितपणे येतात. त्या वाहनांना सुध्दा याठिकाणी कट राहिल्याने ये-जा करण्यास सोयीचे ठरेल. त्यामुळे गौरक्षणमधील गौमाता व इतर जनावरांचा विचार करता तसेच रस्त्यावर कोणतीही वाहतुकीची समस्या निर्माण होवू नये याकरीता रस्ता दुभाजकाला गौरक्षण समोर कट ठेवण्यात यावा. जेणे करून गौमाता व जनावरांना ने-आण करणे सोयीस्कर होईल व वाहतुकीलाही अडथळा निर्माण होणार नाही, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

सदर मागणीबाबत प्रशासनाने योग्य तो व तातडीने निर्णय न घेतल्यास गौरक्षण समोर रस्ता दुभाजकावरच लवकरच चक्काजाम आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही निवेदनाच्या शेवटी देण्यात आला आहे. निवेदन देतेवेळी प्रहार संघटनेचे जिल्हा उपप्रमुख अजय टप यांचेसह आशिष माहुरकर, दिपक कपले, दिपक चवरे बलराम बावस्कार, राहुल संचेती, राजकुमार बाहेती, पंकज टावरी, मिलींद काबरा, मयुर चौधरी, राजू भटेजा, शेख मोहम्मद, करण नायसे, शुभम निवाणे, सतीष दाने, रविंद्र बाम्हंदे, अशोक गाढवे, श्रीकृष्ण सातव, निलेश चोपडे, अमोल टप, बबलु बैरागी, यासह गौमाता सेवक व सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते.

# सरसकट कर्ज माफीच्या मागणीसाठी शिवसेना (उबाठा) चे उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन



प्रतिनिधी १० जून

**मलकापुर:** महायुती सरकारने शेतकऱ्यांना कर्जमाफीत अनेक निकष लावले असून या निकषात ८० टक्के शेतकरी कर्जमाफीत बसत नसल्याने सर्व शेतकऱ्यांवर हा मोठा अन्याय असल्याने आज शिवसेना (उद्धवसाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देऊन कर्जमाफीतील निकष व जाचक अटी काढून सरसकट सर्व शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनावर शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर, विधानसभा संघटक राजेशसिंह राजपूत, हरीदास गणबास शिवसेना शहरप्रमुख, बाळू पोलाखरे उपशहरप्रमुख, नगरसेवक राजुभाऊ पाटील, ॲड. प्रभाकर म्हैसागर, वाहतूक सेना शहरप्रमुख इम्रान लकी, युवासेना उपतालुकाप्रमुख अमीत राजपूत, हसन गौरी, वसीम अन्सारी, एजाजभाई, रफीकभाई पजायेवाले, राहुल झंवर, शंकर कडू सह शिवसेना पदाधिकारी व शेतकऱ्यांच्या सह्या नमूद आहे.

# जिल्ह्यात युरिया, एनपीकेएससह खतांचा मुबलक साठा; अडवणूक झाल्यास तक्रार करा!

## ♦ खत विक्रीतील अनियमिता; कृषी विभागाची करडी नजर!

प्रतिनिधी १० जून



**खामगाव:** खरीप हंगाम तोंडावर आला असून जिल्ह्यातील शेतकरी पेरणीपूर्व तयारीला लागले आहेत. पेरणीसाठी आवश्यक असलेल्या रासायनिक खतांचा जिल्ह्यात मुबलक साठा उपलब्ध असल्याची माहिती कृषी विभागाने दिली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी खतटंचाईच्या अफवांवर विश्वास ठेवता आवश्यकतेनुसार खतांची खरेदी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

कृषी विभागाच्या माहितीनुसार, जिल्ह्यात युरिया, एनपीकेएससह विविध प्रकारच्या खतांचा पुरेसा साठा उपलब्ध असून खरीप हंगामातील संभाव्य मागणी लक्षात घेऊन खत पुरवठ्याचे नियोजन करण्यात आले आहे. शेतकऱ्यांना वेळेवर आणि पुरेशा प्रमाणात खते उपलब्ध व्हावीत यासाठी विभागाकडून सातत्याने आढावा घेतला जात आहे. दरम्यान, काही ठिकाणी खत विक्रीदरम्यान शेतकऱ्यांना अनावश्यक अटी घालणे, इतर वस्तू खरेदी करण्यास भाग पाडणे अथवा खत उपलब्ध असूनही विक्रीस नकार देणे अशा प्रकारांच्या तक्रारी आढळून आल्यास संबंधित कृषी केंद्र चालकांवर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा कृषी विभागाने दिला.

### खत खरेदी करताना ही काळजी घ्या!

शेतकऱ्यांनी खते खरेदी करताना केवळ अधिकृत व परवानाधारक कृषी केंद्रांमधूनच खरेदी करावी. खत खरेदीनंतर विक्रेत्याकडून पक्की पावती घेऊन ती जतन करून ठेवावी. खत उपलब्ध नसल्याचे कारण देत विक्रीस नकार दिला जात असल्यास, अनावश्यक अटी घातल्या जात असल्यास किंवा विक्री प्रक्रियेत कोणतीही अनियमितता आढळल्यास संबंधित कृषी सहायक, तालुका कृषी अधिकारी अथवा कृषी विभागाच्या कार्यालयाकडे त्वरित तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

### जादा खतसाठा टाळा; नियोजनबद्ध खरेदी करा!

जिल्ह्यात खतांचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याने शेतकऱ्यांनी खतटंचाईच्या भीतीने अनावश्यक किंवा जादा साठा करू नये, असे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे.

त्यामुळे अफवांना बळी न पडता ३ गरजेनुसार आणि नियोजनबद्ध पद्धतीने खतांची खरेदी करावी, असे आवाहन कृषी विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

बुधवार, दि. १० जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


# बंद कार्यालय, रिकाम्या खुर्च्या आणि ताटकळणारी जनता

## ◆ जिल्हाधिकारी कार्यालयात लेटलतिफ कर्मचारी, अधिकारी

प्रतिनिधी १० जून





**अकोला :** सकाळी ठीक १०.३० वाजता कार्यालयात पोहोचून आपली कामे करून घेण्याची अपेक्षा घेऊन येणाऱ्या अकोलेकरांच्या पदरी केवळ निराशा पडत आहे. अधिकारी आणि कर्मचारी वेळेवर हजर न राहिल्याने दूरवरून आलेल्या नागरिकांना तासनतास ताटकळत राहावे लागते, जे लोकशाहीत 'जनता जनार्दन' असलेल्या नागरिकांचा अपमान करणारे आहे.

शासकीय कार्यालयांमध्ये वेळेची शिस्त लागावी यासाठी बायोमेट्रिक उपस्थिती अनिवार्य करण्यात आली आहे. मात्र, अकोल्यात या तंत्रज्ञानाचा पुरता बोजवारा उडाला असल्याचे दिसते. 'कोणीही यावं, कधीही जावं' या वृत्तीमुळे बायोमेट्रिक यंत्रणा केवळ कागदावर किंवा नावापुरतीच उरली आहे का, असा प्रश्न निर्माण होतो. कर्मचाऱ्यांच्या या 'लेटलतीफ' कारभारामुळे जिल्हाधिकारी कार्यालयातील शेकडो महत्त्वाच्या फायली प्रलंबित पडल्या आहेत. लोकांची जात प्रमाणपत्रे, महसूलविषयक कामे, दाखले आणि इतर शासकीय योजनांचे लाभ वेळेत मिळत नाहीत. प्रशासकीय शिस्तीचा अभाव थेट सर्वसामान्यांच्या जगण्यावर परिणाम करत आहे.

जनतेच्या या प्रश्नांवर प्रशासनाला जाब विचारणे हे स्थानिक राजकीय पक्ष आणि सामाजिक संघटनांचे कर्तव्य आहे. मात्र, या विषयावर त्यांची असलेली शांतता किंवा सुस्ती अधिक धक्कादायक आहे. विरोधी पक्ष किंवा संघटनांनी या अनागोंदी कारभाराविरोधात आवाज उठवणे गरजेचे आहे. लोकशाहीत 'सरकारी नोकर' हे जनतेचे सेवक असतात, राजे नाहीत. परंतु, अकोल्यातील हे चित्र पाहिले तर उलट परिस्थिती निर्माण झाल्याचे दिसते, जिथे जनतेला दूय्यम वागणूक दिली जात आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः अचानक पाहणी करून लेट येणाऱ्या कर्मचाऱ्यांवर तात्काळ दंडात्मक किंवा शिस्तभंग कारवाई करावी. अशी मागणी होत आहे. बायोमेट्रिक हजेरी थेट कर्मचाऱ्यांच्या वेतनाशी जोडली जावी, जेणेकरून वेळेचे पालन सक्तीचे होईल.वेळेवर अधिकारी न मिळाल्यास नागरिकांना थेट तक्रार करता येईल अशी प्रभावी व्यवस्था कार्यालयात असावी. अकोल्यातील प्रशासनाने या सुस्तीतून बाहेर पडून 'सिटिझन चार्टर' (नागरिकांची सनद) नुसार जनतेला विनाविलंब सेवा देणे आता अत्यंत गरजेचे झाले आहे.


# मिनी मंत्रालयाचा कारभार वाऱ्यावर !

## ♦ जिल्हा परिषदेत ना अधिकारी, ना कर्मचारी; ग्रामीण जनता बेजार

प्रतिनिधी १० जून

**अकोला :** जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अनिता मेश्राम यांची नागपूर येथे बदली झाल्यानंतर, जिल्हा परिषद प्रशासनाचा कारभार पूर्णपणे कोलमडल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. शासकीय नियमांनुसार सकाळी ९.४५ वाजता कार्यालय सुरू होणे अपेक्षित असताना, सकाळी चक्क १०.१५ वाजेपर्यंत कार्यालयात शुकशुकाट असतो. 'मिनी मंत्रालय' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जिल्हा परिषदेत सध्या ना अधिकारी आहेत ना कर्मचारी, त्यामुळे ग्रामीण भागातून विविध कामांसाठी येणाऱ्या सामान्य जनतेला नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. आमच्या प्रतिनिधींनी आज जिल्हा परिषदेची भेट घेतल्यावर भयाण वास्तव समोर आले आहे.

सीईओंच्या बदलीनंतर प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे प्रशासनावर कोणतेही नियंत्रण राहिले नसल्याचे दिसून येत आहे. बांधकाम विभाग, आरोग्य विभाग आणि कृषी विभाग सकाळी सव्वा दहा वाजेपर्यंत पूर्णपणे ओस पडलेले असतात. हीच अवस्था लघुसिंचन विभाग, शिक्षण विभाग आणि अर्थ विभागातही पाहायला मिळत आहे. प्रशासकीय इमारतीतील महत्त्वाच्या केबिन्स रिकाम्या असल्याने, बंद शासकीय कार्यालयांना आणि विभागांना नेमके जबाबदार कोण, असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.



### बायोमेट्रिक यंत्रणाच पडली 'आजारी'

कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीवर लक्ष ठेवण्यासाठी आणि लेट-लतीफ कारभाराला चाप लावण्यासाठी बसवण्यात आलेली बायोमेट्रिक यंत्रणाच सध्या जिल्हा परिषदेत निकामी झाली आहे. अनेक विभागांमधील बायोमेट्रिक मशीन बंद अवस्थेत आहेत. विशेष म्हणजे, आरोग्य विभागाचे बायोमेट्रिक मशीन कधी सुरू तर कधी बंद असते. बायोमेट्रिक यंत्रणेतील या गोंधळामुळे कर्मचाऱ्यांना उशिरा येण्याचे जणू मोकळे रानच मिळाले आहे.



### जिल्हाधिकारी थेट भेट देणार का?

जिल्हा परिषदेत सध्या लोकप्रतिनिधींची सत्ता नाही आणि जबाबदार अधिकारीही जागेवर नाहीत, अशा दुहेरी कात्रीत सामान्य जनता अडकली आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः जिल्हा परिषद आणि महानगरपालिकेला अचानक भेट द्यावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.






# आई मला शाळेला जायचं, शाळेची घंटा २२ ला वाजणार

## ◆ शैक्षणिक साहित्य खरेदीसाठी गर्दी



प्रतिनिधी १० जून

**अकोला :** जिल्ह्यात नवीन शैक्षणिक सत्र सुरू करण्याची तयारी अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. बहुतेक शाळा २२ जून रोजी सुरू होणार आहेत. परिणामी, आजकाल शहरातील प्रमुख बाजारपेठांमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण आहे.

शाळा पुन्हा सुरू होण्यापूर्वी आवश्यक शैक्षणिक साहित्य खरेदी करण्यासाठी विद्यार्थी आणि त्यांचे पालक मोठ्या संख्येने दुकानांमध्ये गर्दी करत आहेत.

नवीन सत्राच्या स्वागतासाठी शहरातील स्टेशनरी, गणवेश, बूट, स्कूल बॅग आणि पुस्तकांची दुकाने आकर्षकपणे सजवण्यात आली आहेत. सकाळपासून ते उशिरा संध्याकाळपर्यंत बाजारपेठांमध्ये खरेदीदारांची गर्दी दिसून येते. दुकानदारांच्या मते, शाळा सुरू होण्यापूर्वीचा काळ हा वर्षातील सर्वात व्यस्त व्यावसायिक कालावधींपैकी एक असतो. विद्यार्थी शहरातील विविध भागांतील दुकानांमधून नवीन पुस्तके, वह्या, गणवेश, बूट आणि पाण्याची बाटली खरेदी करू शकतात.

**शाळेची घंटा लवकरच वाजणार, बाजारात लगबग**

२२ जून ला शाळा पुन्हा सुरू होणार आहे. त्यामुळे गणवेश, पुस्तके आणि फॅन्सी बॅगची मागणी वाढली आहे.शाळा सुरू होण्याआधीच पाण्याच्या बाटल्या, डबे आणि स्कूल बॅगची खरेदी होताना दिसत आहे. अनेक पालक आपल्या मुलांसोबत बाजारात येत असून, शाळांनी ठरवून दिलेल्या यादीनुसार वस्तू खरेदी करत आहेत. दुकानदारांचे म्हणणे आहे की, यावेळी आधुनिक डिझाइनच्या स्कूल बॅग, टिकाऊ बूट आणि उच्च दर्जाच्या स्टेशनरीला मोठी मागणी आहे. खाजगी शाळांचे गणवेश आणि पाठ्यपुस्तकांच्या विक्रीतही मोठी वाढ झाली आहे. खाजगी शाळांच्या गणवेश आणि पाठ्यपुस्तकांच्या विक्रीतही मोठी वाढ झाली आहे. शाळा पुन्हा सुरू करण्याच्या तयारीमुळे शहरातील चिव चिव बाजार , गांधी चौक, टिळक मार्ग, जठार पेठ, कौलखेड चौक, जुने शहर डाबकी रोड , येथील बाजारपेठांमध्ये ग्राहकांची गर्दी वाढली आहे. या भागांतील पुस्तक विक्रेते, गणवेश केंद्रे आणि स्टेशनरीची दुकाने दिवसभर खरेदीदारांनी गजबजलेली दिसून येत आहेत.

### शाळांमध्ये दुरुस्तीचे काम सुरू

◆ नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी, जिल्ह्यातील शासकीय आणि खाजगी शाळांमध्ये दुरुस्ती आणि देखभालीचे काम वेगाने सुरू आहे. वर्गखोल्या रंगवणे, स्वच्छता, फर्निचर दुरुस्ती आणि इतर आवश्यक कामांना प्राधान्य दिले जात आहे. विद्यार्थ्यांची सुरक्षितता आणि उत्तम शैक्षणिक वातावरण सुनिश्चित करण्यासाठी अनेक शाळांमध्ये नवीन सीसीटीव्ही कॅमेरे बसवले जात आहेत. याव्यतिरिक्त, वर्गखोल्यांमध्ये नवीन बाक आणि डेस्क बसवण्याचे आणि जुन्या फर्निचरची दुरुस्ती करण्याचे काम सुरू आहे.

# जिल्ह्यातील ४९८ ग्रामपंचायतींच्या सदस्य आरक्षणाची सोडत जाहीर


प्रतिनिधी १० जून

**अमरावती:** राज्यातील बिगर व अंशतः अनुसूचित क्षेत्रातील सन २०२४ आणि २०२५ मध्ये मुदत संपलेल्या, तसेच सन २०२६ च्या कालावधीत मुदत संपणाऱ्या नवनिर्मित ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार जिल्ह्यातील ४९८ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी सदस्यांच्या आरक्षण निश्चितीचा आणि आरक्षण फिरवण्याचा कार्यक्रम अधिकृतपणे जाहीर करण्यात आला आहे. जिल्ह्यातील तालुक्यांतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायतींसाठी आरक्षण सोडतीचा कार्यक्रम १० ते १२ जून २०२६ या तीन दिवसांच्या कालावधीत राबविला जाणार आहे. नागरिकांनी आरक्षण सोडतीला उपस्थित राहावे, असे आवाहन उपजिल्हाधिकारी ज्ञानेश्वर घ्यार यांनी केले आहे.

# हर्षजित देशमुख रुग्णालयात!

प्रतिनिधी १० जून

**अमरावती :** गेल्या दोन-तीन दिवसांपासून प्रचारात ॲक्टिव्ह नसलेले काँग्रेसचे विधान परिषदेचे उमेदवार हर्षजीत देशमुख अखेर आपली प्रकृती बरी नसल्याने नागपूरच्या एका खाजगी रुग्णालयात उपचार घेत आहेत. निवडणुकीला एक आठवडा शिल्लक उमेदवार रूग्णालयात असल्याने काँग्रेसच्या नगरसेवकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी सोशल मीडियावर पोस्ट टाकून या संदर्भाची माहिती दिली. कामामुळे आणि व्यस्त वेळापत्रकामुळे थकवा आल्याचे निकटवर्ती यांनी सांगितले.






# वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाची प्रलंबित कामे मार्गी लावा : जिल्हाधिकारी

प्रतिनिधी १० जून



**अकोला :** वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पामुळे भविष्यात जिल्ह्यातील सिंचनक्षमता वाढण्यास मोठी मदत होणार आहे. पाण्याचे नियोजनबद्ध व्यवस्थापन, शेतीसाठी उपलब्ध होणारे अतिरिक्त पाणी तसेच दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी हा प्रकल्प उपयुक्त ठरणार आहे. त्यामुळे प्रकल्पाशी संबंधित जमीन संपादन, मान्यता, प्रशासकीय प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्यासाठी सर्व विभागांनी जबाबदारीने व समन्वयाने काम करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे दिले. नदीजोड प्रकल्पाच्या जिल्हाधिकारी कार्यालयातील आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी डॉ. मुरली इंगळे, मृद व जलसंधारण अधिकारी अमोल मस्कर, पाटबंधारे विभागाचे चिन्मय वाकोडे यांच्यासह अनेक अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्रीमती मीना म्हणाल्या की, प्रकल्पाच्या अंमलबजावणीदरम्यान महसूल, सार्वजनिक बांधकाम, वन, जलसंपदा तसेच इतर संबंधित विभागांची भूमिका महत्त्वाची आहे. सर्व विभागांनी समन्वयाने काम करून प्रलंबित बाबी तातडीने मार्गी लावाव्यात.

प्रकल्पाच्या टप्पा २ व ३ मध्ये प्रस्तावित कालवा अकोला जिल्ह्यातून जात असून प्रकल्पाच्या कामांना गती द्यावी. टप्पा २ मध्ये निम्न वर्धा जलाशय ते काटेपूर्णा जलाशय (१२६.९४५ किमी) आणि टप्पा ३ मध्ये काटेपूर्णा जलाशय ते नळगंगा जलाशय (१०९ किमी) जोडण्याचे प्रस्तावित आहे. प्रकल्पामुळे पावसावर अवलंबून असलेली शेती अधिक सुरक्षित होईल. पाणी उपलब्ध झाल्याने उद्योगधंद्याच्या विकासाला मदत होईल. शेती, पशुपालन व संबंधित व्यवसायांना फायदा होईल. ग्रामीण व शहरी भागांना वर्षभर पिण्याचे पाणी उपलब्ध राहील. वैनगंगा – नळगंगा नदीजोड प्रकल्पात मुख्य कालव्याची लांबी ३८८.२८ किमी असून, लाभ क्षेत्र ४ लक्ष ४ हजार २८१ हे., तसेच सिंचन क्षमता ६ लक्ष ११ हजार १५० हे. असेल. प्रकल्पाची प्रशासकीय मान्यता ९४ हजार ९६७ कोटी रू. आहे. मुख्य कालव्याच्या दोन्ही बाजूंना ५० धरणांचा प्रस्ताव आहे. त्यात ३२ नवीन धरणे असून, विद्यमान १८ पैकी १० धरणांची उंची वाढविण्यात येणार आहे. अकोला जिल्ह्यात टप्पा-२ मध्ये मुख्य कालव्याअंतर्गत मूर्तिजापूर, अकोला, बार्शिटाकळी तालुक्यातील गावे समाविष्ट आहेत. साठवण स्थळांमध्ये कानडी, निम्न काटेपूर्णा, सिसा उदेगाव, हातोला, तसेच काटेपूर्णा प्रकल्पावरून प्रस्तावित उपसा सिंचन योजना प्रस्तावित आहे. काटेपूर्णा ते नळगंगा लिंक ३ प्रकल्पाच्या नदीजोड मुख्य कालव्याची लांबी १०९ किमी आहे. मुख्य कालव्याच्या दोन्ही बाजूंना एकूण ८ धरणांचा प्रस्ताव आहे. त्यापैकी ७ नवीन प्रस्तावित असून, एका विद्यमान धरणाची उंची वाढविण्यात येणार आहे.




नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, मुख्याधिकारी, सभापती, उपसभापती, नगरसेवक, कर्मचारीवृंद
बार्शिटाकळी नगर पंचायत, बार्शिटाकळी



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क** – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135


CMYK CMYK